सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित



## मान्सूनची प्रतीक्षा कायम!

मुंबई : जून महिन्याचा तिसरा आठवडा संपत आला असताना- ही महाराष्ट्रात मान्सून पूर्णपणे सक्रिय झालेला नाही. त्यामुळे राज्यातील अनेक भागांमध्ये उष्णता आणि दमट हवामानाचा त्रास वाढला असून शेतकऱ्यांच्या पेरण्या देखील रखडल्या आहेत. हवामान विभागाने दिलेल्या ताज्या अंदाजानुसार २२ ते २३ जूननंतर कोकण आणि काही भागांत मान्सूनला पुन्हा गती मिळण्याची शक्यता आहे. कोकणातील पालघर, ठाणे, मुंबई, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी हलक्या पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. मात्र, बहुतांश भागात उष्ण आणि दमट हवामान कायम राहणार असून काही भागांत ४० ते ५० किलोमीटर प्रतितास वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे.

## जलतरण तलाव बंद !

अलिबाग : जिल्ह्यातील उष्ण व दमट हवामान, मान्सूनच्या आगमनास झालेला विलंब, कमी पर्जन्यमान आणि उपलब्ध जलसाठ्यातील घट लक्षात घेता जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष किशन जावळे यांनी जिल्ह्यातील सार्वजनिक पाणीपुरवठा योजनांवर अवलंबून असलेले सर्व जलतरण तलाव (स्विमिंग पूल) दि. २० जून ते ३० जून २०२६ या कालावधीत बंद ठेवण्याचे आदेश जारी केले आहेत.आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून हा निर्णय घेण्यात आला आहे. भारतीय हवामान विभागाच्या दि. २० जून २०२६ च्या अंदाजानुसार रायगड जिल्ह्यात उष्ण व दमट हवामान राहण्याची शक्यता असून दुपारनंतर किंवा सायंकाळी हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसासह मेघगर्जनेची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. यासाठी जिल्ह्याला 'यलो अलर्ट' देण्यात आला आहे.

## 'ऑपरेशन टायगर'मध्ये ट्विस्ट?

मुंबई : उबाठा गटातील ६ खासदारांच्या बंडामुळे देशाच्या राजकारणात खळबळ उडालेली असतानाच, आता या नाट्यमय घडामोडींना एक नवे वळण मिळाले आहे. पवनराजे निंबाळकर हत्याकांडाच्या निकालानंतर त्यांचे पुत्र आणि बंडखोर खासदार ओमराजे यांनी, अद्याप शिवसेनेत जाण्याचा निर्णय घेतला नसल्याचे जाहीरकेल्याने उबाठागटाने तातडीने त्यांच्याशी संपर्क साधला. शनिवारी मध्यरात्री आमदार वरुण सरदेसाई आणि कैलास पाटील यांनी त्यांची भेट घेत, उद्धव ठाकरे यांच्याशी फोनवरून चर्चा घडवून आणली. हे समजताच एकनाथ शिंदे सतर्क झाले असून, त्यांनी आपला शिलेदार ओमराजे यांच्या भेटीसाठी धाराशिवला रवाना केला आहे.

## मृगाची हुलकावणी

नाशिक : चैत्र आणि वैशाख महिन्यात हमखास बरसणाऱ्या वळवाच्या सरी यावर्षी आल्या नाहीत. त्यात मृगनक्षत्राने हुलकावणी दिली आहे. त्यामुळे जलाशयांची माया अटली आहे. रानावनात हिरवळ निर्माण झालेली नाही. सर्वत्र वैराण वाळवंटाप्रमाणे रखरखीत उन्हाळा जून महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यातही कायम राहिला आहे. मानवी वस्तीला पिण्याच्या पाण्यासह पशुधनाला आवश्यक असणारे चारा पाणी आता दुरापास्त होत आहे. यापुढील चार दोन दिवसांत पाऊस आला नाही, तर भीषण दुष्काळाची चाहुल लागली, असे म्हणावे लागेल अशी स्थिती आहे.

## अण्णा हजारेंचा इशारा

राळेगणसिद्धी : माहितीचा अधिकार कायदा हा जनतेच्या हातातील सर्वात प्रभावी शस्त्र असून त्याला बोथट करण्याचा प्रयत्न सरकारकडून सुरू असल्याचा गंभीर आरोप करत ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी राज्य सरकारला थेट इशारा दिला आहे.

# योग मानवतेला एकत्र आणणारी शक्ती; पंतप्रधान मोदींचा जगाला संदेश

वृत्तसंस्था




कोलकाता : आंतरराष्ट्रीय योग दिन २०२६ निमित्त कोलकाता येथे आयोजित विशेष कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी योगाचे महत्त्व अधोरेखित करत मानवतेला एकत्र जोडण्याचा संदेश दिला. योग हा केवळ व्यायाम किंवा शारीरिक श्रमाचा प्रकार नसून तो मानवी चेतना, ऊर्जा आणि एकतेचा मार्ग असल्याचे त्यांनी सांगितले.पश्चिम बंगाल ही रामकृष्ण परमहंस आणि स्वामी विवेकानंद यांसारख्या महान संतांची भूमी असल्याचे नमूद करत मोदी म्हणाले की, या संतांनी योग आणि अध्यात्माचा संदेश जगभर पोहोचवला. अशा पवित्र भूमीवर हजारो लोकांसोबत योगाभ्यास करणे हा एक अद्वितीय आध्यात्मिक अनुभव आहे.महर्षी अरविंद यांच्या विचारांचा उल्लेख करत पंतप्रधान म्हणाले, आपल्याला जाणीव असो वा नसो, आपले संपूर्ण जीवनच योग आहे. जेव्हा योग जीवनशैलीचा अविभाज्य भाग बनतो, तेव्हा तो व्यक्तीला स्वतःशी आणि समाजाला मानवतेशी जोडतो. योग कोणत्याही एका वयोगटापुरता मर्यादित नसून तो प्रत्येकासाठी जीवन समृद्ध करणारा मार्ग आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.यंदाच्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त जगभरातील २१० हून अधिक भारतीय दूतावासांमार्फत सुमारे २,५०० ठिकाणी विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.भारतातही १०० हून अधिक ऐतिहासिक आणि सांस्कृतिक स्थळांवर योग दिन साजरा केला जात आहे. या निमित्ताने संपूर्ण जग योगाच्या माध्यमातून एकत्र आल्याचे चित्र पाहायला मिळत असल्याचे मोदी यांनी सांगितले.

योगामुळे व्यक्ती शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या अधिक सक्षम बनते, असे सांगताना पंतप्रधानांनी एक महत्त्वपूर्ण संदेश दिला. वयाच्या २० व्या वर्षापेक्षा ४० व्या वर्षी अधिक लवचिक, ३० व्या वर्षापेक्षा ५० व्या वर्षी अधिक उत्साही आणि ४० व्या वर्षापेक्षा ७० व्या वर्षी आजारांशी लढण्यास अधिक सक्षम बनणे हे आपले ध्येय असले पाहिजे, असे ते म्हणाले.योग दिनानिमित्त देशभरात उत्साहाचे वातावरण असल्याचे सांगताना मोदी म्हणाले की, हिमालयापासून हिंद महासागरापर्यंत, ईशान्य भारतापासून सौराष्ट्रापर्यंत संपूर्ण देश योगाच्या ऊर्जेने भारलेला दिसत आहे. जगाच्या विविध भागांतून येणारी योग दिनाची दृश्ये भारताच्या सांस्कृतिक शक्तीची साक्ष देत आहेत.

# राज्यपालांचा योगाभ्यास; प्रशिक्षित योग शिक्षक घडवण्याचे आवाहन

तभा वृत्तसेवा




मुंबई : आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी शनिवारी महाराष्ट्र लोकभवन येथे भारतीय तटरक्षक दलाच्या अधिकाऱ्यांसह योगसत्रात सहभाग घेतला. यंदाचा योग दिन कार्यक्रम भारतीय तटरक्षक दलाच्या सहकार्याने आयोजित करण्यात आला. विशेष म्हणजे, भारतीय तटरक्षक दल यावर्षी आपल्या सुवर्णमहोत्सवी वर्षात प्रवेश करत आहे. या योगसत्राला तटरक्षक दलाचे अधिकारी, त्यांचे कुटुंबीय तसेच महाराष्ट्र लोकभवनातील अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.यावेळी उपस्थितांना संबोधित करताना राज्यपालांनी राज्यातील सार्वजनिक विद्यापीठांनी योगाचा व्यापक प्रचार-प्रसार करावा तसेच जगासाठी दर्जेदार योग शिक्षक आणि प्रशिक्षक घडवावेत, असे आवाहन केले.योगाला आज जागतिक स्तरावर मान्यता मिळाल्याचे नमूद करताना राज्यपाल म्हणाले की, पूर्वी योगाचा अभ्यास प्रामुख्याने घरे, आश्रम आणि योग संस्थांपुरता मर्यादित होता. मात्र, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संयुक्त राष्ट्रसंघाकडे २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून घोषित करण्याचा प्रस्ताव मांडल्यानंतर आज १५० हून अधिक देशांमध्ये हा दिवस उत्साहात साजरा केला जात आहे.योग हा केवळ मानसिक आरोग्यासाठीच नव्हे, तर शारीरिक आणिभावनिक स्वास्थ्यासाठीही अत्यंत उपयुक्त असल्याचे त्यांनी सांगितले.यावेळी राज्यपालांनी भारतीय तटरक्षक दलाच्या कार्याचेही कौतुक केले. १९७७ मध्ये स्थापन झाल्यापासून तटरक्षक दल राष्ट्रसेवेत महत्त्वपूर्ण योगदान देत असून आज ते भारताच्या सागरी सुरक्षा व्यवस्थेचा भक्कम आधारस्तंभ बनले आहे, असे त्यांनी नमूद केले.समुद्रातील जीविताचे संरक्षण, मच्छीमारांची सुरक्षा, बेकायदेशीर कारवायांवर नियंत्रण तसेच किनारपट्टी सुरक्षेची जबाबदारी तटरक्षक दलाने प्रभावीपणे पार पाडली आहे. कठीण परिस्थितीतही अधिकारी आणि जवान अथक परिश्रम करून देशाचे समुद्र सुरक्षित आणि संरक्षित ठेवत आहेत, असे राज्यपाल म्हणाले.राज्यातील २९ विद्यापीठांचे कुलपती म्हणून आपण विद्यापीठांनायोग क्षेत्रात उत्कृष्ट प्रशिक्षक घडविण्यासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन करत असल्याचेही त्यांनी सांगितले.

# योग करा, निरोगी रहा आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त फडणवीसांचे आवाहन

तभा वृत्तसेवा






मुंबई : बदलत्या लाईफस्टाईल (जीवनशैली) मुळे विविध आजारांचे प्रमाण वाढत असून, त्यापासून बचाव करण्यासाठी योग हा अत्यंत प्रभावी आणि रामबाण उपाय असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. नियमित योगाभ्यास केल्यास जीवनशैलीशी संबंधित आजारांपासून दूर राहता येते, असे त्यांनी सांगितले.

जुहू बीच येथील फूड कोर्टजवळ आयोजित करण्यात आलेल्या १२ व्या आंतरराष्ट्रीय (जागतिक) योग दिन कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, खासदार रवींद्र वायकर, आमदार अमित साटम, शिवप्रकाश, केशव उपाध्ये, पवन त्रिपाठी, दीप्ती वायकर, उषा बेन यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की,सातत्याने योग करणारी व्यक्ती कोणत्याही मानसिक परिस्थितीत आलेल्या आव्हानांचा यशस्वीपणे सामना करू शकते. योगामुळे शरीर निरोगी राहण्यासोबतच मन प्रसन्न आणि स्थिर राहते.त्यामुळे योग विद्येचा अधिकाधिक प्रचार आणि प्रसार होणे आवश्यक आहे.ते पुढे म्हणाले की, भारताने संयुक्त राष्ट्र संघात २१ जून हा आंतरराष्ट्रीय योग दिवस म्हणून साजरा करण्याचा प्रस्ताव मांडला होता. संयुक्त राष्ट्रांच्या इतिहासात अत्यंत कमी कालावधीत आणि कोणत्याही विरोधाशिवाय मंजूर झालेल्या प्रस्तावांपैकी हा एक महत्त्वाचा प्रस्ताव ठरला.

आज भारताच्या पुढाकारामुळे जगभर योगाचा प्रसार झाला असून, शारीरिक आणि मानसिक आरोग्यासाठी योगाचे महत्त्व संपूर्ण जगाने मान्य केले आहे.योग ही केवळ शारीरिक व्यायाम पद्धती नसून मन,आत्मा आणि शरीर यांचा समतोल साधणारी विद्या असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.माणसाचे मन आणि निसर्ग यांचा जवळचा संबंध असून, योगाद्वारे हा संबंध अधिक दृढ होतो. नियमित योगाभ्यासामुळे शरीर तंदुरुस्त राहतेच, शिवाय मानसिकदृष्ट्याही व्यक्ती अधिक सक्षम बनते, असे त्यांनी नमूद केले.

# तामीळनाडूत अमोनिया गळतीमुळे सात जणांचा मृत्यू; ७० जखमी

वृत्तसंस्था



चेन्नई : तामीळनाडूत सीफूड प्रोसेसिंग युनिटमध्ये अमोनिया गळती झाली. ही घटना तामीळनाडूतील तिरुवल्लूर जिल्ह्यात घडली. अमोनिया गळतीमुळे सीफूड प्रोसेसिंग युनिटमध्ये सात जणांचा मृत्यू झाला आणि ७० जण जखमी झाले. जखमींना जवळच्या रुग्णालयांमध्ये दाखल केले आहे.हाती आलेल्या माहितीनुसार, तामीळनाडूतील तिरुवल्लूर जिल्ह्यातल्या पेरियपालयम जवळ कनिगईपैरमध्ये 'सेंट पीटर्स पॉल सीफूड एक्सपोर्ट्स'च्या प्रकल्पात अमोनिया गळती झाली. अमोनिया गळती झाल्याचे लक्षात येताच प्रकल्प व्यवस्थापनाने अरक्कोणम येथील एनडीआरएफच्या टीमशी तातडीने संपर्क साधून घटनेची माहिती दिली. घटनेची माहिती मिळताच अरक्कोणम येथील एनडीआरएफची एक टीम तातडीनेघटनास्थळीपोहोचली. एनडीआरएफच्या सदस्यांनी त्यांच्या मुख्यालयाशी संपर्क साधून चौथ्या क्रमांकाची बटालियन घटनास्थळी तातडीने पोहोचेल अशी व्यवस्था केली. घटनास्थळी एनडीआरएफच्या मार्गदर्शनात मदतकार्य सुरू आहे.मुख्यमंत्री सी. जोसेफ यांनी अमोनिया गळती प्रकरणी चौकशी करण्यासाठी समिती स्थापन करण्याचे निर्देश दिले आहेत. इंडस्ट्रियल सेफ्टी अँड हेल्थ विभागाचे संचालक, प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सरचिटणीस आणि सार्वजनिक आरोग्य विभागाचे अतिरिक्त संचालक या तीन जणांची समिती चौकशी करून अहवाल सादर करणार आहे. समिती पुढील २४ तासांत पहिला अहवाल देईल आणि नंतरच्या तीन दिवसांत सविस्तर अहवाल सादर करणार आहे.

# विरोधकांचा चहापानावर बहिष्कार

तभा वृत्तसेवा



मुंबई : विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला आयोजित करण्यात आलेल्या सरकारच्या चहापान कार्यक्रमावर महाविकास आघाडीने रविवारी बहिष्कार घातला. राज्यात दुष्काळ, शेतकरी प्रश्न, महिलांवरील वाढते अत्याचार, ढासळलेली कायदा-सुव्यवस्था, वाढते अमली पदार्थांचे जाळे यांसारख्या अनेक प्रश्नांवर सरकारकडे कोणतेही समाधानकारक उत्तर नसल्याची टीका महाविकास आघाडीने केली. राज्यावर दुष्काळाचे संकट आहे. पेरण्या लांबल्या आहेत, शेतकऱ्यांसमोरील अडचणी वाढत आहे.

सरकारने सुका दुष्काळ जाहीर करावा. सरकारने जाहीर केलेली कर्जमाफी ही फसवी असून त्यात शेतकऱ्यांना अटी शर्तीमध्ये अडकवण्यात आले आहे. महायुती सरकारने शेतकऱ्यांचा ७/१२ कोरा करावा, अशी मागणी महाविकास आघाडीने पत्रकार परिषदेत केली. विधान परिषदेचे काँग्रेस गटनेते सतेज पाटील यांनी, हे सरकार ५६ टक्के कमिशन सरकार असल्याची टीका केली. राज्यात कंत्राटदारांनी अधिवेशन घेऊन कामांची बिले मिळवण्यासाठी मोठ्या प्रमाणात कमिशन द्यावे लागत असल्याचे सांगितले. कंत्राटदारांची तब्बल एक लाख कोटी रुपयांहून अधिक बिले प्रलंबित आहेत. जल जीवन मिशनच्या निधीत कपात झाली असून अनेक विकासकामे रखडली आहेत. दुसरीकडे राज्यावरील कर्जाचा बोजा साडेनऊ लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचल्याने महाराष्ट्राची आर्थिक स्थिती चिंताजनक बनली आहे, अशी टीका सतेज पाटील यांनी केली.

राष्ट्रवादीचे नेते जयंत पाटील म्हणाले राज्यात कायदा आणि सुव्यवस्था कोलमडली आहे.महिलांवर अत्याचार वाढले आहे. ड्रगचे प्रमाण राज्यात प्रचंड वाढले आहे. अशा प्रकरणात छोट्या लोकांना अटक होते.पण मास्टर माईंड मात्र मोकाट असतात. अमली पदार्थ विकणारे आणि पोलिसांचे हितसंबंध आहेत यातून या घटना वाढत आहे. देवस्थानच्या जमिनीचा घोटाळा मागील अधिवेशनात मांडला. पण काही कारवाई नाही, अशी टीका जयंत पाटील यांनी केली.जनतेच्या प्रश्नांवर चर्चा करण्याची तयारी नसलेल्या सरकारसोबत औपचारिक चहापानाला उपस्थित राहणे योग्य नसल्याने आम्ही या कार्यक्रमावर बहिष्काराचा निर्णय घेतल्याचे यावेळी सांगण्यात आले. राज्यातील १३ कोटी जनतेच्या हिताचे प्रश्न सोडविणे हे सरकारचे कर्तव्य असून पावसाळी अधिवेशनात हे सर्व मुद्दे महाविकास आघाडी आक्रमकपणे मांडणार असल्याची भूमिका मविआने पत्रकार परिषदेत मांडली.

# विधिमंडळाची दोन्ही सभागृहे विरोधीपक्ष नेत्याविनाच!

तभा वृत्तसेवा



मुंबई : महाराष्ट्र विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन उद्या, सोमवारपासून सुरू होत असून, या अधिवेशनाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांत 'विरोधी पक्षनेता' नसेल. विधानसभेचे विरोधी पक्षनेतेपद हे विद्यमान सरकार अस्तित्वात आल्यापासून रिक्त आहे; तर विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेतेपद अंबादास दानवे यांचा कार्यकाळ संपल्यापासून रिक्त राहिले आहे. दोन्ही सभागृहातील विरोधकांचे संख्याबळ पाहता २२ जून ते १० जुलै या कालावधीत चालणारे हे अधिवेशन देखील विरोधी पक्षनेत्याविनाच चालणार असून, जनतेचे ज्वलंत प्रश्न सभागृहात ताकदीने मांडण्याऐवजी विरोधक सध्या स्वतःचे अस्तित्व आणि आमदार टिकवण्यासाठी चाचपडत असल्याचे सध्याचे चित्र आहे. विधानसभेत सध्या २० आमदारांसह ठाकरे गट हा तांत्रिकदृष्ट्या सर्वात मोठा विरोधी पक्ष असला, तरी त्यांच्यावर सातत्याने फुटीची टांगती तलवार आहे. दुसरीकडे, शरद पवार गटातूनही नवीन राजकीय स्थित्यंतराची शक्यता नाकारता येत नाही. त्यातच सरकारने विरोधी आमदारांच्या विकास निधीला मोठ्या प्रमाणावर कात्री लावल्यामुळे त्यांची दुहेरी कोंडी झाली आहे. सभागृहात सरकारविरोधात अधिक आक्रमक झाल्यास मतदारसंघातील विकासकामे पूर्णपणे ठप्प होण्याची आणि वैयक्तिक कामे अडकण्याची भीती विरोधी आमदारांना सतावत आहे. त्यामुळे अनेक विरोधी आमदारांनी सध्या मौन बाळगणेच पसंत केले आहे. ठाकरे गटाकडून भास्कर जाधव आणि सुनील प्रभू यांच्याव्यतिरिक्त एकाही आमदाराला सभागृहात आपला प्रभाव पाडता आलेला नाही. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाकडे अनुभवी नेत्यांची आणि माजी मंत्र्यांची फौज असली, तरी अंतर्गत गटबाजी आणि समन्वयाच्या अभावामुळे त्यांची शक्ती विखुरलेली दिसत आहे.

# होर्मुझमध्ये तणाव, पण भारत निर्धास्त! लाखो टन कच्चे तेल घेऊन ३ जहाजे भारताकडे रवाना

वृत्तसंस्था



तेहरान : पश्चिम आशियातील वाढत्या तणावाच्या आणि होर्मुझच्या सामुद्रधुनीवरीलअनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवर भारतासाठी दिलासादायक बातमी समोर आली आहे. भारतीय ध्वज असलेले तीन कच्चे तेलवाहू टँकर होर्मुझच्या सामुद्रधुनीतून सुरक्षितपणे बाहेर पडले असून ते भारतातील बंदरांकडे मार्गस्थ झाले आहेत. केंद्रीय नौवहन, बंदरे आणि जलमार्ग मंत्रालयाने याला दुजोरा दिला आहे.अमेरिका-इराण तणाव आणि प्रादेशिक संघर्षांमुळे जगातील सर्वात महत्त्वाच्या तेल-वाहतूक मार्गांपैकी एक असलेल्या होर्मुझ सामुद्रधुनीबाबत चिंता व्यक्त केली जात असताना ही घडामोड भारताच्या ऊर्जा सुरक्षेसाठी महत्त्वाची मानली जात आहे.

केंद्रीय मंत्री सरबानंद सोनोवाल यांनी सोशल मीडियावर माहिती देताना सांगितले की, 'देश वैभव' हा टँकर २४ जून रोजी गुजरातमधील वडीनार बंदरात पोहोचणार आहे. या जहाजात २.८६ लाख मेट्रिक टनांहून अधिक कच्चे तेल असून ३७ भारतीय खलाशी कार्यरत आहेत. तसेच 'देश विभोर' हे दुसरे जहाज २४ जूनलाच गुजरातमधील सिक्का बंदरात दाखल होणार आहे.या टँकरमध्ये जवळपास २.८९ लाख मेट्रिक टन कच्चे तेल आहे.दरम्यान, 'सन्मार हेराल्ड' हे तिसरे जहाज पूर्व किनाऱ्यावरील पारादीप बंदराच्या दिशेने रवाना झाले असून १ जुलैपर्यंत ते भारतात पोहोचण्याची शक्यता आहे. या जहाजावर ३० भारतीय खलाशी असून त्यात २.८५ लाख मेट्रिक टन कच्चे तेल आहे. या तिन्ही जहाजांमधून एकूण ८.६० लाख मेट्रिक टनांहून अधिक कच्चे तेल भारतात येत असून त्यावर ९४ भारतीय कर्मचारी कार्यरत आहेत.केंद्रीय मंत्री सोनोवाल यांनी सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताच्या सागरी हितसंबंधांचे संरक्षण आणि ऊर्जा पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी सरकार सर्वोच्च प्राधान्याने काम करत आहे. संवेदनशील परिस्थितीतही भारतीय जहाजे सुरक्षितपणे मार्गस्थ झाल्याने मोठा दिलासा मिळाला आहे.

दरम्यान, अमेरिका आणि इराण यांच्यातील करारानंतर होर्मुझ सामुद्रधुनीतील वाहतूक सुरळीत होण्याची आशा निर्माण झाली होती. मात्र इस्रायल-लेबनॉन संघर्ष कायम असल्याने परिसरातील तणाव पुन्हा वाढला आहे. या पार्श्वभूमीवर इराणच्या संयुक्त लष्करी कमांडने होर्मुझ सामुद्रधुनीतील जलवाहतुकीवर पुन्हा निर्बंध लागू करण्याची घोषणा केली आहे. कराराच्या अटींचे उल्लंघन सुरू राहिल्यास आणखी कठोर पावले उचलली जातील, असा इशाराही इराणने दिला आहे.



सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# यशवाडी दुर्घटनेतील मृताच्या कुटुंबीयांचे आ.बबनराव लोणीकर यांच्याकडून सांत्वन



**तभा वृत्तसेवा**
**मंठा । प्रतिनिधी**

यशवाडी त्रिमूखी हनुमान मंदिर येथे झालेल्या भीषण दुर्घटनेत मृत्यूमुखी पडलेल्या संतोष सर्जेराव गडदे (रा. गडदे पांगरा, ता. मंठा) यांच्या पांगरा गडदे येथील निवासस्थानी आमदार बबनराव लोणीकर यांनी भेट देऊन कुटुंबीयांचे सांत्वन केले. दुर्घटनेत संतोष गडदे यांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याने परिसरात शोककळा पसरली आहे.

या पार्श्वभूमीवर आमदार लोणीकर यांनी गडदे कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांच्या दुःखात सहभागी होत धीर दिला. तसेच या कठीण प्रसंगी शासनाच्या विविध योजनांमधून आवश्यक ती मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, अशी ग्वाही त्यांनी दिली. यावेळी उपस्थित ग्रामस्थांनीही दिवंगत संतोष गडदे यांना श्रद्धांजली अर्पण केली. अचानक घडलेल्या या दुर्घटनेमुळे संपूर्ण परिसर हळहळ व्यक्त करीत असून, मृतांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. आमदार लोणीकर यांनी दिवंगत संतोष गडदे यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून श्रद्धांजली वाहिली व कुटुंबीयांना धीर देत या दुःखद प्रसंगात आपण त्यांच्या पाठीशी असल्याची भावना व्यक्त केली. या प्रसंगी भाजपा मंठा तालुका अध्यक्ष नितीन राठोड, विठ्ठलमामा काळे, प्रसादराव गडदे, पंजाबराव पुणेकर, प्रकाशराव गडदे दत्तराव गडदे नरहरी गडदे रविचंद्र देवकते समाधान गडदे दिलीप गडदे पंढरीनाथ गडदे यांच्यासह गावातील शेकडो प्रतिष्ठित नागरिकांची उपस्थिती होती.

# जालना शहरतील गुंडगिरीचा बिमोड करण्यासाठी त्यांना संरक्षण देणाऱ्यांचीही नावे जाहीर करा - संपर्कप्रमुख भास्करराव अंबेकर

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

शहरातील दत्तनगर येथे हर्शल मोटवानी व सौरभ मोटवानी यांना काही अज्ञात समाजकंटकांनी क्षुल्लक कारणावरून शिवीगाळ करून मारहाण केल्याचीन घटना नुकतीच घडली. या घटनेची माहिती कळताच शिवसेना संपर्कप्रमुख श्री.भास्करराव अंबेकर यांनी पदाधिकाऱ्यांसह मोटवानी त्यांच्या निवास्थानी जाऊन भेट घेतली व अत्यंत भयभीत झालेल्या मोटवानी कुटुंबीयांना धीर दिला. यावेळी यांच्यासोबत माजी शहरप्रमुख बाला परदेशी, नगरसेवक दुर्गेश काठोटीवाले, योगेश भगत, दीपक राठोड, अर्जुन गेही, माजी शहरप्रमुख घनशाम खाकीवाले यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.



यावेळी संपर्कप्रमुख भास्करराव अंबेकर यांनी जालना शहरातील वाढत्या गुंडगिरीचा बिमोड करण्यासाठी त्यांना संरक्षण देणाऱ्यांची नावे जाहीर करण्याची मागणी करतांना म्हणाले की, शहरात गुंडांना कायद्याचा धाक राहिला नाही. पोलीस प्रशासनाचा वचक कमी झाल्याने गुन्हेगारी प्रवृत्ती वाढत आहे. गुन्हेगारांना अटक केल्यानंतर लगेच त्यांना सोडवण्यासाठी त्यांचे रक्षणकर्ते तेथे हजरच असतात. अशा गुंडांना पाठबळ देणाऱ्या रक्षण कर्त्यामुळे शहरात गुन्हेगारी मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. करिता गुन्हेगारांचे संरक्षण करणारे राजकीय अथवा अराजकीय कोणीही असोत त्या व्यक्तींची नावे जाहीर करावीत जेणेकरून गुन्हेगारांना नेमके कोण पाठबळ देते हे जनतेला कळेल. जालना शहर हे गावठी कट्ट्यांचे केंद्र बनले आहे. अनेकांचे यामुळे निष्पाप बळी गेले आहेत. तरुण पिढी नशेच्या आहारी जाऊन व्यसनाधीन होत आहे. नशेच्या गोळ्या खाऊन शहरात दहशत निर्माण केली जात आहे. अशा गुंडांना कायद्याची भीती वाटत नाही. त्यामुळे पोलिसांनी बळाचा वापर करून चौका-चौकात असे गुंड झोडपून काढले पाहिजेत. जेणेकरून सामान्य नागरिकांच्या मनातील भीती त्यामुळे दूर होईल. जालन्यात नूतन पोलीस अधीक्षक आल्यापासून मात्र नागरिकात एक आशावाद निर्माण झाला आहे. तरुण मुली, महिला, व्यापारी व सामान्य नागरिक यांच्या मनातील भीती घालवण्यासाठी पोलीस प्रशासनाने कठोर पावले उचलण्याची गरज असल्याचे भास्करराव अंबेकर म्हणाले. दरम्यान दत्तनगर येथील जखमींची विचारपूस करतानाच माजी नगराध्यक्ष भास्करराव अंबेकर यांनी आमदार अर्जुनराव खोतकर यांना दूरध्वनीवरून सविस्तर माहिती दिली. ते अधिवेशना निमित्त मुंबईत असल्याने जालन्यात आल्यावर पोलीस अधीक्षकांची शिवसेना पदाधिकाऱ्यांसह भेट घेऊन कठोर कारवाईची मागणी करणार असल्याचे माजी नगराध्यक्ष भास्करराव अंबेकर यांनी सांगितले.

## संक्षिप्त

### ओंकारेश्वर संन्यास आश्रमात योग दिनानिमित्त विद्यार्थ्यांना योगाचे धडे



**तभा वृत्तसेवा**
**मंठा । प्रतिनिधी**

मंठा तालुक्यातील खवणे देवगाव येथील श्री क्षेत्र ओंकारेश्वर संन्यास आश्रमात आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहपूर्ण आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. आश्रमाचे महंत बालकगिरीजी महाराज यांच्या नेतृत्वात आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात संस्कार प्रबोधिनी गुरुकुल मधील विद्यार्थ्यांसह ग्रामस्थांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

यावेळी महंत बालगिरीजी महाराज यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना योगाचे शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक जीवनातील महत्त्व समजावून सांगितले. योग हा केवळ व्यायामाचा प्रकार नसून मन, शरीर आणि आत्मा यांना संतुलित ठेवणारी भारतीय संस्कृतीची अमूल्य परंपरा असल्याचे त्यांनी नमूद केले. नियमित योगाभ्यासामुळे शरीर निरोगी राहते, मन प्रसन्न राहते, एकाग्रता वाढते आणि जीवनशैलीत सकारात्मक बदल घडतो, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमादरम्यान महंत बालगिरीजी महाराज यांनी विद्यार्थ्यांसमोर विविध योगासने, प्राणायाम तसेच श्वसनाच्या क्रियांचे प्रात्यक्षिक करून दाखवले. विद्यार्थ्यांनीही मोठ्या उत्साहाने योगासनांचा सराव केला. आश्रम परिसरात झालेल्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये योगाबद्दल कुतूहल निर्माण झाले असून, दैनंदिन जीवनात योगाचा समावेश करण्याची प्रेरणा मिळाल्याचे दिसून आले. आश्रमात आयोजित या योग दिन कार्यक्रमामुळे परिसरात 'योग करा, निरोगी रहा' हा संदेश प्रभावीपणे पोहोचला. कार्यक्रमाचे वातावरण अत्यंत शिस्तबद्ध, प्रेरणादायी आणि आध्यात्मिक भावनेने परिपूर्ण होते. या कार्यक्रमास आश्रमातील सेवेकरी, विद्यार्थी, ग्रामस्थ, भाविक तसेच योगप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल उपस्थितांनी आश्रम व्यवस्थापनाचे कौतुक केले.

### जळगांव सपकाळ येथील जि.प.शाळेत योग दिन साजरा



**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन । प्रतिनिधी**

तालुक्यातील जळगाव सपकाळ येथे जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेमध्ये जागतिक योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थी, शिक्षक व कर्मचारी यांनी मोठ्या उत्साहाने या कार्यक्रमात सहभाग नोंदविला.

कार्यक्रमाच्या प्रसंगी सुभाष साबळे यांनी विविध योगासने व प्राणायामाचे महत्त्व सांगितले.तर क्रीडा शिक्षिका सौ अनिता लोखंडे अश्विनी वाघ यांनी योगासन प्रत्यक्ष प्रात्यक्षिक करून दाखविले. नियमित योगाभ्यासामुळे शारीरिक व मानसिक आरोग्य चांगले राहते तसेच एकाग्रता व आत्मविश्वास वाढतो, असे त्यांनी यावेळी सांगितले. या कार्यक्रमास मुख्याध्यापक नासेर , अशोक आराक, नितीन बाहेकर,रुपेश टाकळकर, राऊत ,प्रकाश ताम्हणे, सोनुने,चिचपुरे तसेच शाळेतील शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्व उपस्थितांनी सामूहिक योगाभ्यास करून निरोगी जीवनाचा संदेश दिला. कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांनी नियमित योग करण्याचा संकल्प करून जागतिक योग दिनाचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याचे आवाहन करण्यात आले.

# भोकरदन उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय येथे प्रतिबंधक कार्यवाहीचा कॅम्प संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन । प्रतिनिधी**

तेगबीर सिंग संधू ,पोलीस अधीक्षक जालना यांचे मार्गदर्शनात जिल्ह्याचे अपर पोलीस अधीक्षक श्री विक्रम साळी यांनी भोकरदन उपविभागामधील सराईत आरोपींच्या विरुद्ध प्रतिबंधक कार्यवाहीची विशेष मोहीम घेतली. यामध्ये भोकरदन, जाफराबाद, हसनाबाद, टेंभुर्णी व पारध या पोलीस ठाण्याच्या अभिलेखावरील सराईत अपराधी व गंभीर गुन्ह्यातील अपराधी अशा १०५ इसमांवर बीएनएसएस कायद्यानुसार प्रभावी प्रतिबंधक कार्यवाही करण्यात आली.अपर पोलीस



अधीक्षक श्री विक्रम साळी यांनी या गुन्हेगारी पार्श्वभूमी असणाऱ्या सर्व इसमांना समाज उपद्रवी हालचाली आणि गुन्हे करू नये तसेच यानंतर गुन्हे कराल तर प्रभावी कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल अशा प्रकारच्या सक्त सूचना दिल्या. कायदा हातात घेणाऱ्यांची गय केली जाणार नाही असा स्पष्ट संदेश दिला.

या प्रतिबंधक कार्यवाही मोहिमेसाठी भोकरदन उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. नितीन कटेकर यांनी परिश्रम घेतले.तसेच उपविभागातील पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक श्री किरण बिडवे, पोलीस निरीक्षक श्री सतीश जाधव , सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री योगेश उबाळे, सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री अविनाश राठोड, पोलीस उपनिरीक्षक श्री वाल्मीक नेमाने उपस्थित होते.

# शिवसेनेच्या वतीने एसबीआय शाखा व्यवस्थापक सूत्राले यांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**बदनापूर । प्रतिनिधी**

शहरातील एसबीआय शाखा व्यवस्थापक अंकुश सुत्राले यांचा शिवसेना जिल्हाप्रमुख ,यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा शिवसेना कार्यालया च्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी युवा सेना विधानसभा संघटक ,माजी सैनिक चंद्रकांत पवार, धर्मवीर आनंदी नागरी सहायता कक्षाचे युवा दूत कैलास वैद्य ,तुषार दाभाडे अनिल भाऊ देशमुख ,दिनेश बारगजे यांची उपस्थिती होती यावेळी यापूर्वीचे शाखा व्यवस्थापक मनोज कुमार महतो यांचा निरोप प्रसंगी सत्कार करण्यात आला यावेळी नूतन शाखा व्यवस्थापक अंकुश सुत्राले यांनी एसबीआय शाखेच्या वतीने ग्राहकांना विविध योजनांची माहिती दिली यात ग्राहकांसाठी विविध प्रकारच्या बचत गुंतवणूक आणि सरकारी योजना राबल्या जात असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले .हर घर लखपती योजना, अमृत कलश ,सुकन्या समृद्धी योजना ,प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना आदी योजनाची माहिती दिली

# शरीर हीच खरी संपत्ती ,निरोगी तन आणि शांत मनाची गुरुकिल्ली म्हणजेच योग –माजीमंत्री रावसाहेब दानवे

**तभा वृत्तसेवा**
**जाफराबाद । प्रतिनिधी**

आजच्या युगात मानवाचे बहुतांश खानपान हे विविध प्रकारच्या रासायनयुक्त झालेले असुन विविध प्रकारच्या जबाबदाऱ्यांनी मानवाचे जिवनमान धावपळीचे झाले आहे त्यातच बहुतांश नागरीकांचे जेवन,झोप यासह दिवसाची दिनचर्या अवेळी होत असल्याने शरीरात रोज वेगवेगळे बदल होत असतात आणि शरीर वेगवेगळ्या व्याधींनी ग्रासल्या जाते यात थकवा,अपचन,अँशीडीटी,पित्त,यासारख्या व्याधींनी पुर्ण झोप होत नसल्याने अशा विविध शारीरीक समस्या वाढत चालल्या आहे म्हणुन शरीर सुदृढ व तंदुस्त ठेवण्यासाठी मानवी जिवनाला योग,प्राणायाम,विविध कसरती करण्याची अत्यंत गरज असुन यामुळे शरीर निरोगी राहुन मानवाला दिर्घ आयुष्य लाभते म्हणुन शरीर हीच खरी संपत्ती असून निरोगी तन आणि मन शांतीसाठी योग करणे हीच गुरुकिल्ली असल्याचे प्रतिपादन जागतिक योगदिनी माजी केंद्रीय रेल्वे कोळसा व खनिजकर्म मंत्री रावसाहेब दानवे यांनी केले .

२१ जुन रविवार रोजी स्वामी समर्थ मंदिराच्या प्रांगणावर योग प्राणायाम एक दिवशीय शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात महापुरुषांच्या प्रतिमा पुजनाने करण्यात आली २१ जून हा योग दिन असुन योग आणि प्राणायाम याचा उगम आपल्या भारतीय संस्कृतीत झाला.या दिनाचे महत्व आणि इतिहास माजी मंत्री दानवे यांनी सांगितले. यावेळी, कृउबा समितीचे सभापती गोंविदराव पंडीत,संतोष लोखंडे, साहेबराव कानडजे,नगरसेवक सुरेश दिवटे नगरसेवक दिपक वाकडे ,नगरसेवक अनिल बोर्डे, नगरसेविका डॉ . सुरेखा लहाने , योग शिक्षक एकनाथ घाटगे ,रवि गावंडे, संजय लहाने ,रविराज जैस्वाल,नाना पंडीत, राजु चिडे, राजु वैद्य, मनिषा मोरे,बेबीनंदा कणखर ज्ञानेश्वर निकम, उद्धव दूनगहू, अमोल कोलते, सुनिल साळवे,राहुल वाकडे, यांच्यासह नागरीकांची व विशेषतः महीलांची मोठ्या संख्येने उपस्थीती होती. पुढे बोलतांना ते माजीमंत्री दानवे म्हणाले की योग आणि प्राणायाम याचा उगम आपल्या देशात २५० हजार वर्षांपूर्वी झालेला आहे. याचे सर्वश्रेय गौतम बुद्ध ,भगवान महावीर, स्वामी विवेकानंद ,पतंजली यांना जाते यांनी योगाचा प्रसार आणि प्रचार जगभर केला आपण हा दिवस २१ जून २०१५ पासून १० वर्षापासुन जगभर आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरा केल्या जात आहे या धावपळीच्या युगात प्रत्येक माणसाला सुदृढ आणि निरोगी राहण्यासाठी दीर्घायुष्य व बलशाली व राष्ट्र बलवान बनवण्यासाठी प्रत्येकाला शरीराची काळजी घेणे गरजेचे आहे कारण प्रत्येक मनुष्य हा राष्ट्राचा आधारस्तंभ आहे म्हणून आजच्या या मंगल दिनापासून संकल्प करू या दररोज सकाळ संध्याकाळ कमीत कमी अर्धा तास योग प्राणायामासाठी देऊया असे अवाहनही त्यांनी केले. तर यो-गगुरू एकनाथ घाटगे म्हणाले की शरीर तंदुरुस्त ठेवण्यासाठी योगा अत्यंत योग्य उपाय आहे. नियमित योगा केल्यामुळे शारीरिक आणि मानसिक आरोग्य वाढतं. आजकालच्या धावपळीच्या जीवनात स्वतःला फिट ठेऊ इच्छित असाल तर योगा हा नक्कीच चांगला उपाय असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी योगगुरू रवि गावंडे यांनी शरीर सुदृढ तथा फिट राहण्यासाठी आष्टांग योगाची आठ अंग आणि त्याचे महत्व सांगितले यात यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, ध्यान आणि समाधी याचेही महत्व सांगत नमस्कारासन, वज्रासन, अर्धचंद्र आसन, नटराजसन, मंडूकासन, सुर्यासन, गोमुख आसन, शवासन, भुजंगासन, सर्वांगआसन, मत्सासन, वक्रासन यासह विविध योगासनांचे प्रात्यक्षिके करुन दाखविली. आभार एकनाथ घाटगे यांनी मानले तर कार्यक्रम यशस्वीतेसाठी भाजपा कार्यकर्ते तथा वेलनेस परीवाराने परिश्रम घेतले राष्ट्र गीतांने कार्यक्रमाची सांगता करणयात आली.यावेळी वेलनेस परीवाराच्या वतीने संगितमय वर्कआऊटही करण्यात आले .

# जालना जिल्हा क्रीडा संकुलात आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा



**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

पंतप्रधानांच्या पुढाकारातून २०१४ मध्ये संयुक्त राष्ट्र महासभेने २१ जून हा दिवस 'आंतरराष्ट्रीय योग दिन' म्हणून घोषित केल्यानंतर जगभरात हा दिवस मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. त्यानिमित्त जालना जिल्ह्यातही आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त जिल्हा प्रशासन, जिल्हास्तर योग समिती, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, शिक्षणाधिकारी (प्राथमिक व माध्यमिक), जिल्हा परिषद जालना, क्रीडा भारती, जिल्हा योग संघटना, सार्वजनिक आरोग्य विभाग, जिल्हा युवा अधिकारी, मेरा युवा भारत, विविध योग संस्था, जिल्हा स्काऊट अँड गाईड तसेच जिल्हा एकविध क्रीडा संघटना आणि विविध क्रीडा मंडळांच्या संयुक्त विद्यमाने आज जिल्हा क्रीडा संकुल, जालना येथे सामूहिक योग शिबिर व योग प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात आले होते. या योग कार्यक्रमास निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, इंटरनॅशनल नॅचरोपॅथी ऑर्गनायझेशनचे अध्यक्ष दादासाहेब भुतेकर, डॉ. प्रकाश आंबेकर, क्रीडा प्रबोधिनीचे व्यवस्थापक सचिन पाटील, जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार, जिल्हा युवा अधिकारी मयुरकुमार गोरमे, जिल्हा सल्लागार आयुष विभाग डॉ. कुलदिप वाघपंजर, मिलिंद तायडे, श्रीमती सोनिया सिरसाठ, जिल्हा संघटक स्काऊट व गाईड, जालना, विजय गाडेकर, विनोद चोबे, क्रीडा संघटक, युवा बहुद्देशीय सेवाभावी संस्था व विविध कार्यालयाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. सर्वप्रथम प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दिप प्रज्वलन करून योग दिनाची सुरूवात करण्यात आली. तदनंतर योगगुरू मनोज लोणकर, श्रीमती रिषीता नाथानी , प्रणव किनगावर, सहाय्यक योग शिक्षक यांनी प्रत्यक्ष योगा प्रात्यक्षिकांना सुरूवात केली. प्रमुख पाहुण्यांसह सर्व उपस्थितांनी योग प्रात्यक्षिके सामुहिकरित्या केली. यावेळी प्रमुख पाहुण्याच्या हस्ते वृक्षार-ोपण करण्यात आले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन क्रीडा अधिकारी श्रीमती लता लोंढे यांनी तर आभार प्रदर्शन जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जालनाचे राज्य क्रीडा मार्गदर्शक तसेच शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त सिध्दार्थ कदम यांनी केले. यावेळी शहरातील विविध अधिकारी कर्मचारी, विविध क्रीडा संघटनेचे पदाधिकारी, विद्यार्थी, पालक, शासकीय नर्सिंग महाविद्यालयाच्या विद्यार्थीनी, ऑक्सफर्ड हायस्कुल, संस्कार प्रबोधिनी विद्यालय, जालना व जि.प.निवासी क्रीडा प्रबोधिनी, जालना येथील स्काऊट व गाईड पथक मुले व मुली सह, खेलो इंडिया खो-खो प्रशिक्षण केंद्राचे खेळाडू, जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्राचे खेळाडू, क्रीडा प्रेमी, क्रीडा संघटक, युवक युवती यांच्यासह मोठया संख्येने योगार्थी उपस्थित होते. या कार्याक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार यांचे मार्गदर्शनाखाली सिध्दार्थ कदम, राज्य क्रीडा मार्गदर्शक, श्रीमती लता लोंढे, क्रीडा अधिकारी श्रीमती आरती चिल्लारे संतोष प्रसाद, वरिष्ठ लिपीक अमोल मुसळे, कनिष्ठ लिपीक राहुल राठोड,राहुल गायके, जयपाल राठोड , हारूण खान, भानुदास लांडगे, विजय कांबळे, श्रीमती.लताबाई लांडगे, श्रीमती. सिंधु लांडगे आदिनी परिश्रम घेऊन यशस्वीपणे आंतरराष्ट्रीय योग दिनाचे आयोजन करण्यास सहकार्य केले.

# दर्जेदार शिक्षणातूनच गरिबी निर्मूलन शक्य -हेरंब कुलकर्णी

## शिक्षण हे व्यक्ती, समाज व राष्ट्राच्या प्रगतीचे सर्वात प्रभावी साधन –घनश्यामदास गोयल

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

आज भारतामधील प्राथमिक शिक्षणात दर्जेदार सुधारणा करणे हे सर्वात मोठे आव्हान बनले आहे. गरिबांची मुले गरिबीमुळे शाळा सोडतात ही या देशातील सर्वात मोठी अंधश्रद्धा आहे. युनेस्कोच्या अहवालानुसार, जगात सर्वात जास्त ड्रॉपआऊट तिसऱ्या वर्गात होतो, कारण दोन वर्षांत लिहिता-वाचता आले नाही की मुले शाळा सोडतात. ही अतिशय अस्वस्थ करणारी आणि खेदाची गोष्ट आहे. जर वर्गामध्ये काय चालले आहे हे त्या मुलाला कळणारच नसेल, त्याला वाचता-लिहिता येत नसेल, तर तो विद्यार्थी का वर्गात थांबेल? आणि मग तो शाळा सोडून देतो. अशा वेळी आपली शिक्षण व्यवस्था आणि समाज पालक किंवा गरिबीवर दोष ढकलून मोकळा होतो. पायाभूत शिक्षण पक्के असलेला विद्यार्थी कधीच शाळा सोडत नाही. शिक्षणाअभावी गरिबीचे प्रमाण वाढत चालले असून, शासनाने लोककल्याणकारी योजना नव्हे तर दर्जेदार शिक्षणावर भर दिला तरच गरिबी निर्मूलन शक्य आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र शासनाच्या एकल पालक मसुदा समितीचे सदस्य, शिक्षणतज्ज्ञ, लेखक व सामाजिक कार्यकर्ते हेरंब कुलकर्णी यांनी येथे बोलताना केले. अध्यक्षीय भाषणात उद्योजक घनश्यामदास गोयल यांनी संस्थेच्या या उपक्रमाचे कौतुक केले. ते म्हणाले की, शिक्षण हे व्यक्ती, समाज आणि राष्ट्राच्या प्रगतीचे सर्वात प्रभावी साधन आहे. आर्थिक किंवा सामाजिक



अडचणींमुळे कोणत्याही मुलाचे शिक्षण थांबता कामा नये. आज वाटप करण्यात आलेले साहित्य केवळ वस्तू नसून ती विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी दिलेली प्रेरणा आहे. जालना एज्युकेशन फाउंडेशनने एकल पालकांच्या पाल्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देण्याचे जे कार्य हाती घेतले आहे, ते अत्यंत कौतुकास्पद आहे. अशा उपक्रमांना आपले सदैव सहकार्य राहील.

जालना एज्युकेशन फाउंडेशनतर्फे रविवार दि. २१ जून रोजी कॉलेज रोडवरील महाराजा अग्रसेन फाउंडेशनमध्ये लोकसहभागातून जालना जिल्ह्यातील एकल पालकांच्या पाचशे मुलांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. त्याप्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून हेरंब कुलकर्णी बोलत होते. अध्यक्षस्थानी उद्योजक घनश्यामदास गोयल हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कृष्णकांत कनवारीया, महानगरपालिकेच्या आयुक्त श्रीमती अंजली शर्मा, उद्योजक यशराज पित्ती तर व्यासपीठावर एकल पालक उपक्रमाचे प्रकल्प प्रमुख प्रा. ओमप्रकाश झांजरी, जालना एज्युकेशन फाउंडेशनचे अध्यक्ष सुनील रायठठ्ठा, उपाध्यक्ष प्रा. सुरेश लाहोटी, सचिव सुरेश कुलकर्णी यांची उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना हेरंब कुलकर्णी यांनी सध्याच्या शैक्षणिक वातावरणावर भाष्य केले. ज्यांना पायाभूत शिक्षण मिळत नाही, तीच मुले पुढे शाळाबाह्य होतात. शाळांमध्ये सुरुवातीचा किमान एक महिना वाचन-लेखनाची क्षमता तप-ासणारी चाचणी घ्यावी आणि पुढील तीन महिने रोज शाळा भरण्यापूर्वी विद्यार्थ्यांचे वाचन-लेखन वर्ग घ्यावेत, अशी आग्रही विनंती त्यांनी सीईओ डॉ. कृष्णकांत कनवारिया आणि मनपा आयुक्त अंजली शर्मा यांना केली. महाराष्ट्रात ७० लाख तर जालना जिल्ह्यात ६१ हजार एकल पालक आहेत. त्यांची २ लाख २४ हजार मुले शाळेत येतात. दहावीनंतर शाळा सोडणाऱ्या मुलांची संख्या त्यांची जास्त आहे. एकल पालकांच्या पाल्यांच्या बालविवाहाचे प्रमाण महाराष्ट्रात २२.५ टक्के एवढे आहे. त्यात मराठवाडा अव्वल आहे. एकल पालक आणि त्यांच्या पाल्यांच्या उत्थानासाठी जालना एज्युकेशन फाउंडेशनसारख्या सेवाभावी संस्था, प्रशासन, उद्योजक आणि दानशूर व्यक्ती एकत्रित प्रयत्नातून काहीतरी करत आहे, ही स्तुत्य बाब आहे, असे ते म्हणाले. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कृष्णकांत कनवारीया म्हणाले की, जालना एज्युकेशन फाउंडेशनने एकल महिला आणि त्यांच्या मुलांच्या बाबतीत जे व्हिजन ठेवले आहे, ते वाखाणण्याजोगे आहे. जिल्ह्यातील अशा एकल महिलांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी जिल्हा प्रशासन संस्थेसोबत मिळून पूर्ण प्रयत्न करेल. स्वतः मीदेखील झेडपीच्या शाळेतूनच शिकून पुढे आलो आहे. मुलांचे 'फाउंडेशनल लर्निंग' म्हणजेच पाया मजबूत असणे खूप गरजेचे आहे आणि त्यावर काम होणे आवश्यक आहे, आपण त्यासाठी विशेष प्रयत्न करणार आहोत. मनपा आयुक्त श्रीमती अंजली शर्मा म्हणाल्या की, नवीन वर्षाच्या सुरुवातीला मुलांच्या शिक्षणासाठी सर्वजण लोकसहभागातून पुढे आले आहेत, हे पाहून आनंद झाला. शिक्षण हाच मुलांचा आणि त्यांच्या कुटुंबाचा चेहरा बदलू शकणारा एकमेव मार्ग आहे. मातांनी आपल्या पाल्यांच्या शिक्षणासाठी त्यांना खंबीर पाठिंबा दिला पाहिजे. शिक्षणामुळेच मी आज या पदावर पोहोचू शकले आहे, त्यामुळे मुलांच्या प्राथमिक शिक्षणाकडे गांभीर्याने लक्ष दिले पाहिजे. रोजगार निर्मितीसाठी कार्य करणाऱ्या मॅजिक संस्थेचे संचालक तथा उद्योजक यशराज पित्ती म्हणाले की, आतापर्यंत सुमारे ६१ हजार विद्यार्थ्यांना या संस्थेची माहिती देण्यात आलेली असून, ४५० कार्यशाळा घेण्यात आलेल्या आहेत. युवक आणि बेरोजगारांनी या संस्थेला माहिती देऊन करिअर करावे, असे आवाहन त्यांनी केले. प्रास्ताविकपर भाषणात एकल पालक उपक्रमाचे प्रकल्प प्रमुख प्रा.ओमप्रकाश झांजरी यांनी जालना एज्युकेशन फाउंडेशनमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमाची माहिती दिली. पुढील वर्षी लोकसभागातून १ हजार शैक्षणिक साहित्य किट वाटपाचा मनोदय असून, दानशूर व्यक्तींमुळेच हे शक्य होत आहे. आतापर्यंत एकल पालकांच्या ७० मुलांना बाल संगोपन योजनेचा लाभ मिळवून देण्यात आला आहे. वयाच्या वर्षापर्यंत त्यांना प्रतिमा २२५० रुपये मिळणार आहेत. यासाठी महिला व बालविकास विभाग आणि बाल विकास समितीचे सहकार्य लाभत असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरेश कुलकर्णी यांनी केले तर आभार सुनील रायठठ्ठा यांनी मानले. कार्यक्रमाला या उपक्रमासाठी यो-गदान देणारे दानशूर व्यक्ती, विद्यार्थी, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त...

### परभणीत एटीएसच्या १५ ठिकाणी धाडी; शहरात वाढविला पोलीस बंदोबस्त

**परभणी,/प्रतिनिधी :** राज्याच्या दहशतवाद विरोधी पथकाने (एटीएस) शनिवार २० जून रोजी सकाळी परभणी शहरातील विविध भागांमध्ये एकाचवेळी धाडसत्र राबवत तब्बल १५ ठिकाणी छापे टाकले. या कारवाईदरम्यान अनेक संशयितांची चौकशी करण्यात आल्याची माहिती मिळत असून, संपूर्ण कारवाईबाबत गुप्तता पाळण्यात येत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, छत्रपती संभाजीनगर येथील एटीएसचे पथक मागील काही दिवसांपासून परभणीतील काही संशयित व्यक्तींवर पाळत ठेवून होते. शनिवारी सकाळी या पाळतीचे रूपांतर धाडसत्रात झाले. गुजरी बाजार परिसरातील काही दुकाने, धार रस्ता परिसरातील मुमताजनगर तसेच अपना कॉर्नर परिसरातील विविध ठिकाणांवर एटीएसच्या पथकाने छापे टाकून तपास केला. या कारवाईनंतर परभणी पोलिसांनी शहरातील संवेदनशील भागांमध्ये सुरक्षा व्यवस्था वाढविली आहे. शहरातील तीन ठिकाणी पोलिसांची स्थिर पथके नियुक्त करण्यात आली असून धार रस्ता परिसरात अतिरिक्त पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

एटीएसच्या या अचानक कारवाईमुळे शहरात मोठी खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये विविध चर्चांना उधाण आले आहे. मात्र, कारवाईचे नेमके कारण, चौकशीचा विषय अथवा कोणाला ताब्यात घेण्यात आले आहे का, याबाबत अधिकृत माहिती देण्यात आलेली नाही. तपास यंत्रणांकडून पुढील चौकशी सुरू असल्याचे समजते.

### राष्ट्रीय कला-संस्कृती महासंमेलनासाठी मधुकर व मनिषा उमरीकर यांची निवड : ब्रह्माकुमारी संस्थेच्या आबू पर्वत येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्तरावरील महासंमेलनात करणार कला सादरीकरण

**परभणी,/प्रतिनिधी :** प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय, आबू पर्वत (राजस्थान) यांच्या वतीने ज्ञान सरोवर परिसरात २५ ते २९ जून दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या कला आणि संस्कृती प्रभागाच्या राष्ट्रीय महासंमेलनासाठी परभणी येथील ज्येष्ठ नाट्यकलावंत तथा 'श्यामची आई' या एकपात्री प्रयोगाचे सादरकर्ते मधुकर उमरीकर आणि महाराष्ट्र स्कूल ऑफ ड्रामा, विजयश्री नगर (परभणी) यांच्या संचालिका तथा निवेदिका मनिषा उमरीकर यांची निवड करण्यात आली आहे.

राष्ट्रीय स्तरावरील या महासंमेलनात देशभरातील कला व संस्कृती क्षेत्रातील मान्यवर कलाकार, साहित्यिक आणि सांस्कृतिक कार्यकर्ते सहभागी होणार आहेत. महासंमेलनात कला, संस्कृती, अध्यात्म आणि सामाजिक मूल्ये यांच्यातील परस्परसंबंधांवर विविध विषयांवर मार्गदर्शन, विचारमंथन तसेच चर्चासत्रांचे आयोजन करण्यात आले आहे. या महासंमेलनात मधुकर उमरीकर आणि मनिषा उमरीकर यांना आपल्या कलाविष्काराचे सादरीकरण करण्याची संधी मिळणार असून, परभणीच्या सांस्कृतिक क्षेत्रासाठी ही अभिमानास्पद बाब मानली जात आहे. त्यांच्या निवडीबद्दल विविध सांस्कृतिक, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिनंदन करण्यात येत आहे.

### शिवसेना शिंदे गटाद्वारे खासदार संजय जाधव यांच्या प्रतिमेला दुग्धाभिषेक : निर्णयाचे केले स्वागत : जोरदार घोषणाबाजी

**परभणी,/प्रतिनिधी:** खासदार संजय जाधव यांच्या समर्थनार्थ शिवसेना जिल्हाप्रमुख आनंद भरोसे यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांनी शनिवारी शहरातील छत्रपती शिवाजी चौकात खासदार जाधव यांच्या प्रतिमेला दुग्धाभिषेक करून त्यांच्या निर्णयाचे स्वागत केले.

यावेळी महिला जिल्हाप्रमुख गीताताई सूर्यवंशी, जिल्हा संघटक डॉ. मदन लांडगे, उपजिल्हा प्रमुख मारोती पवार, बाळासाहेब पानपट्टे, वटाणे, विधानसभा संघटक संदीप जाधव, महानगर प्रमुख माणिक पौंढे, तालुका संघटक उध्दव गायकवाड, उप तालुकाप्रमुख सुभाष गरुड, बाळासाहेब मोहटे, शहरप्रमुख सचिन पाटील, पप्पू वाघमारे, अरुण झांबरे, निखील जैन, संजय शामार्थी, अशोक गव्हाणे, राहुल ठाकूर, प्रवीण टेकाळे, दीपक शिंदे, राहुल काळे, नीरज बुचाले यांच्यासह मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते. उपस्थित शिवसैनिकांनी खासदार संजय जाधव यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत त्यांच्या पुढील राजकीय आणि सामाजिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच जिल्ह्याच्या विकासासाठी त्यांनी घेतलेल्या जनहिताच्या निर्णयांचे कौतुक करण्यात आले.

यावेळी बोलताना जिल्हाप्रमुख भरोसे यांनी खासदार संजय जाधव यांच्या नेतृत्वाखाली परभणी जिल्हा विकासाच्या नव्या उंचीवर पोहोचेल, असा विश्वास व्यक्त केला. त्यांच्या नेतृत्वामुळे जिल्ह्याच्या विकासाला अधिक गती मिळेल, असेही त्यांनी सांगितले.

### बाबळगाव फाटा येथील जिल्हा मध्यवर्ती बँकेत तोडफोड

**पाथरी,/प्रतिनिधी :** पाथरी तालुक्यातील बाबळगाव फाटा येथील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या शाखेत शनिवारी (दि. २०) सायंकाळी साडेचार वाजण्याच्या सुमारास एका व्यक्तीने घुसून तोडफोड केल्याची घटना घडली. या प्रकारामुळे बँक परिसरात एकच खळबळ उडाली असून कर्मचारी व ग्राहकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित व्यक्ती अचानक बँकेच्या शाखेत दाखल झाला. काही कारणावरून त्याचा बँकेतील कर्मचाऱ्यांशी वाद झाला. वाद वाढत गेल्यानंतर संतप्त झालेल्या त्या व्यक्तीने बँकेतील साहित्याची तोडफोड करण्यास सुरुवात केली. यावेळी बँकेत बसविण्यात आलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांसह इतर साहित्याचे नुकसान झाल्याचे सांगण्यात येत आहे.

तोडफोडीदरम्यान संबंधित व्यक्तीने एका कर्मचाऱ्याला मारहाण केल्याची माहितीही समोर आली आहे. अचानक घडलेल्या या प्रकारामुळे बँकेत उपस्थित ग्राहकांमध्ये घबराट पसरली आणि काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी गर्दी केली. घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आल्यानंतर पोलिसांनी तातडीने घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. तसेच पंचनामा करून बँकेतील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे तपास सुरू केला आहे. तोडफोड व मारहाणीमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून पोलिसांकडून सर्व बाजूंनी चौकशी करण्यात येत आहे.

या घटनेमुळे बाबळगाव फाटा परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. संबंधित व्यक्तीविरुद्ध कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत असून पोलिस तपासानंतर घटनेमागील कारणे व नुकसानाचा तपशील स्पष्ट होण्याची शक्यता आहे.

# जिल्ह्यातील २.१९ लाख बालकांना पोलिओ डोसचे उद्दिष्ट

## २८ जून रोजी राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहीम, : जिल्हास्तरीय कार्यबल बैठकीत पूर्वतयारीचा आढावा

**परभणी ,/प्रतिनिधी:-** राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार जिल्ह्यात २८ जून रोजी राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीम राबविण्यात येणार आहे. जिल्ह्यातील ० ते ५ वर्षे वयोगटातील एकही बालक पोलिओ लसीकरणापासून वंचित राहू नये, यासाठी जिल्हा प्रशासनाने व्यापक नियोजन केले असून जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हास्तरीय पल्स पोलिओ कार्यबल समितीची बैठक घेण्यात आली.

जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नतिषा माथुर आणि जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. नागेश लखमावार यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या बैठकीत पोलिओ मोहिमेच्या पूर्वतयारीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. सर्व संबंधित विभागांनी परस्पर समन्वय साधून मोहीम शंभर टक्के यशस्वी करण्यासाठी कार्य करावे, असे निर्देश यावेळी देण्यात आले.

या मोहिमेअंतर्गत जिल्ह्यात एकूण १,६२३ पोलिओ बुथ राहणार असून २ लाख १९ हजार ८४५ बालकांना पोलिओ प्रतिबंधक डोस देण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. जिल्हा आरोग्य अधिकारी संजयकुमार पांचाळ यांच्या प्रमुख नियंत्रणाखाली मोहिमेची अंमलबजावणी करण्यात येणार आहे.



बैठकीस अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रावजी सोनवणे, आरएमओ डॉ. कल्याण कदम, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालविकास) रेखा कदम, माध्यमिक शिक्षण अधिकारी किशनलाला गुर्जर, खाजगी वैद्यकीय संघटनेचे अध्यक्ष डॉ. स्वप्निल खळीकर, पोलीस विभाग, महावितरण, रेल्वे, परिवहन, तसेच सर्व तालुका वैद्यकीय अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी, जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी, लसीकरण पर्यवेक्षक आणि विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

मोहिमेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी अंगणवाडी केंद्रांवर जनजागृती सभा आयोजित करणे, विद्यार्थ्यांची रॅली काढणे, बाजारपेठ परिसरात ध्वनिक्षेपकाद्वारे प्रचार करणे, बसस्थानकांवर ट्रान्झिट बुथ उभारणे तसेच अखंडित वीजपुरवठा सुनिश्चित करण्याच्या सूचना देण्यात आल्या. विटभट्ट्या, बांधकाम स्थळे, स्थलांतरित वस्त्या, दुर्गम पाडे आणि इतर जोखीमग्रस्त भागांमध्ये विशेष सर्वेक्षण राबविण्याचे निर्देशही यावेळी देण्यात आले. पावसाळ्यात संपर्क तुटणाऱ्या गावांमधील बालकांपर्यंतही लसीकरण सेवा पोहोचविण्यासाठी आवश्यक नियोजन करण्यावर भर देण्यात आला. दरम्यान, 'दोन थेंब पोलिओचे, आरोग्याच्या सुरक्षेचे' या ब्रीदवाक्यानुसार जिल्ह्यातील सर्व पालकांनी आपल्या पाच वर्षांखालील बालकांना २८ जून रोजी जवळच्या पोलिओ बुथवर नेऊन पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब पाजावेत, असे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे.

## पशुखाद्य व चारा व्यवस्थापन प्रशिक्षणाचा समारोप; २० प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्रांचे वितरण

**परभणी,/प्रतिनिधी-** महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर व महाराष्ट्र राज्य पशुसंवर्धन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने स्मार्ट प्रकल्पांतर्गत पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, परभणी येथे आयोजित करण्यात आलेल्या पशुखाद्य व चारा विषयक क्षमता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचा समारोप १९ जून रोजी उत्साहात झाला.

१५ ते १९ जून २०२६ या कालावधीत आयोजित निवासी प्रशिक्षण कार्यक्रमात कृषी हब ग्रोटेक प्रायव्हेट लिमिटेड, परभणी येथील १० प्रतिनिधी तसेच भूमिपुत्र ग्रोटेक प्रायव्हेट लिमिटेड, हिंगोली येथील १० प्रतिनिधींनी सहभाग नोंदविला. एकूण २० प्रशिक्षणार्थींना पशुखाद्य व चारा व्यवस्थापनासंदर्भातील विविध तांत्रिक बाबींचे प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षणादरम्यान पशुखाद्य निर्मिती, चारा प्रक्रिया तंत्रज्ञान, मुरघास निर्मिती, निकृष्ट चाऱ्यावर युरिया प्रक्रिया, पशुपोषण व्यवस्थापन, दुधाळ जनावरांचे आहार नियोजन, विविध चारा पिकांची निवड व लागवड तंत्रज्ञान, पशुखाद्य निर्मिती केंद्राचे व्यवस्थापन तसेच संगणकीकृत पशुखाद्य निर्मिती यांसह पशुधन विकासासाठी आवश्यक विविध विषयांवर महाविद्यालयातील प्राध्यापक व तज्ज्ञांनी सविस्तर मार्गदर्शन केले. या प्रशिक्षणादरम्यान झालेल्या विविध तज्ज्ञांच्या व्याख्यानांचे संकलन करून तयार करण्यात आलेल्या माहिती पुस्तिकेचे प्रकाशनही डॉ. येवतीकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सर्व प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रशिक्षण सहसमन्वयक प्रा. डॉ. विठ्ठल मुंडे यांनी आभार मानले.

## मानवत येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा उक्कलगाव येथे आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा

**मानवत,/प्रतिनिधी :** उक्कलगाव, दि. २१ जून : आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, उक्कलगाव येथे विद्यार्थी, पालक, ग्रामस्थ व शिक्षणप्रेमी नागरिकांच्या उपस्थितीत योग दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

योग ही भारताची प्राचीन आणि अमूल्य देणगी असून नियमित योगाभ्यासामुळे शरीर निरोगी राहते, मन शांत होते आणि तणाव दूर होण्यास मदत होते.

याच उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या योग कार्यक्रमात सकाळी ७ ते ८ या वेळेत योग शिक्षक विलास मिटकरी सर यांच्या मार्गदर्शनाखाली विविध योगासने व प्राणायामाचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले.



या उपक्रमात गावातील ज्येष्ठ नागरिक, पालक, शिक्षणप्रेमी नागरिक, ज्येष्ठ पदवीधर शिक्षक श्री सरोदे सर, श्री शिंदाळकर सर, श्री योगेश देशमुख सर तसेच शाळेतील सर्व विद्यार्थी मोठ्या उत्साहाने सहभागी झाले.

जागतिक योग दिनानिमित्त आयोजित या कार्यक्रमास गटशिक्षणाधिकारी श्री तोष्णीवाल साहेब, पंचायत समितीचे माजी सभापती व सदस्य श्री शिवाजीराव उक्कलकर, सरपंच श्री उत्तमराव गायकवाड, उपसरपंच श्री एकनाथराव पिंपळे, शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा श्रीमती राणीताई अंकुशराव पिंपळे, उपाध्यक्ष श्री सोपानराव पिंपळे, सर्व शालेय व्यवस्थापन समिती सदस्य, मुख्याध्यापक श्री शेख सर, शाळेतील सर्व शिक्षक-शिक्षिका व शिक्षणप्रेमी नागरिकांनी शुभेच्छा देऊन कार्यक्रमास प्रोत्साहन दिले.

योग दिनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण होऊन योगाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. कार्यक्रम यशस्वीरीत्या संपन्न झाला.

## जिंतूरमधील प्रवासी निवारा पाडल्याने संताप

### रस्ता रुंदीकरणाच्या नावाखाली मध्यरात्री कारवाई, आंबेडकरी समाजाकडून निषेध

**जिंतूर,/प्रतिनिधी** शहरातील बलसा कॉर्नर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रवासी निवारा रस्ता रुंदीकरणाच्या कामाच्या नावाखाली २० जूनच्या रात्री पाडण्यात आल्याने आंबेडकरी समाजात तीव्र संतापाची लाट उसळली आहे. संबंधित कारवाई ही पूर्वसूचना न देता आणि सामाजिक भावना दुखावणारी असल्याचा आरोप करत कंत्राटदारासह संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी आंबेडकरी चळवळीच्या कार्यकर्त्यांनी केली आहे. पुढील आठ दिवसांत तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला आहे.

याबाबत आंबेडकरी समाजाकडून उद्या तहसील प्रशासनाला निवेदन देण्यात येणार आहे. बलसा कॉर्नरवर गत पंचवीस वर्षांपासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने उभारण्यात आलेला प्रवासी निवारा आहे. याठिकाणाहून दैनंदीन प्रवासी वाहतूक मोठ्या प्रमाणावर होत असते, प्रवाशांना हा निवारा सामाजिक दृष्ट्या महत्त्वाचा असून, तो रात्रीच्या वेळी पाडण्यात आल्याने नागरिकांच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत. रस्ता रुंदीकरणासाठी पर्यायी उपाययोजना न करता थेट तोडकाम करण्यात आल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. संबंधित १९फ्रीवे प्रायव्हेट लिमिटेड कंपनीच्या कंत्राटदाराने मनमानी पद्धतीने कारवाई केल्याचा आरोप करत त्याच्यावर तात्काळ गुन्हा दाखल करावा, तोडकामाची चौकशी करावी आणि दोषींवर



कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात येणार आहे.

दरम्यान, या घटनेच्या निषेधार्थ आंबेडकरी संघटना व सामाजिक कार्यकर्त्यांनी तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे. प्रशासनाने तातडीने दखल घेऊन न्याय्य कारवाई करावी, अन्यथा लोकशाही मार्गाने व्यापक जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

या घटनेमुळे जिंतूर शहरात वातावरण तापले असून प्रशासनाची भूमिका काय राहणार याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

शहरातील मुख्य प्रवेश चौकात असणारा प्रवाशी निवारा म्हणजे या भागातील जवळपास वीस गावातील वयोवृद्ध नागरिक आणि विद्यार्थ्यांना ऊन वारा पावसाचा मोठा आसरा आहे, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या नावे गत पंचवीस वर्षांपासून उभा असलेला प्रवाशी निवारा मनमानी करून उध्वस्त केल्याने संबंधित कंत्राटदारावर गुन्हा दाखल करावा, या प्रकाराने आंबेडकरी समाजात तीव्र संताप वाढला असून या विरोधात आंदोलन छेडण्यात येईल.

ॲड.चंद्रकांत बहिरट

माजी नगरसेवक जिंतूर

जिंतूर तालुक्यातील आडगाव फाटा ते देवगाव फाटा या मुख्य रस्त्यावर विविध धर्मांचे धार्मिक ध्वज आणि हिंदू धर्माचे छोटे देवस्थान असून रस्ता रुंदीकरण करतांना त्याला वळण देण्यात आले आहे. मात्र डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे नाव असणारा प्रवाशी निवारा उध्वस्त केल्याने सामाजिक अन्याय झाल्याचे दुःख आहे. पुढील आठ दिवसांत याची पूर्नर बांधणी करण्यात आली नाही तर तीव्र आंदोलन करण्यात येईल.

सतिश वाकळे

वंचित बहुजन आघाडी नेते जिंतूर

### जिल्हा युवा पुरस्कारासाठी ६ जुलैपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**परभणी,/प्रतिनिधी :** राष्ट्र आणि राज्यनिर्मितीत युवकांची भूमिका महत्त्वपूर्ण असून सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या युवक, युवती तसेच युवा विकासासाठी कार्यरत संस्थांच्या गौरवासाठी राज्य शासनाच्या युवा धोरणांतर्गत राज्य व जिल्हा युवा पुरस्कार प्रदान करण्यात येतात. या पुरस्कारांसाठी पात्र युवक, युवती आणि संस्थांनी ६ जुलै २०२६ पर्यंत अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी गीता साखरे यांनी केले आहे अधिक माहितीसाठी सुयश नाटकर (मो. ९७६३९९४८४६) आणि रोहन औंढेकर (मो. ८९९९३३७९२९) यांच्याशी संपर्क साधावा, असेही जिल्हा क्रीडा अधिकारी गीता साखरे यांनी कळविले आहे.

## यशवाडी दुर्घटनेतील जखमींची आ. डॉ.राहुल पाटील यांनी केली विचारपूस

**परभणी,/प्रतिनिधी :** मानवत तालुक्यातील यशवाडी येथे हनुमान मंदिरात बांधकाम सुरू असलेल्या सभागृहाचे छत कोसळून झालेल्या भीषण दुर्घटनेत पाच भाविकांचा मृत्यू झाला असून वीसहून अधिक भाविक जखमी झाले आहेत. या दुर्घटनेतील जखमींवर परभणी येथील आर.पी हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत.

या पार्श्वभूमीवर आ.डॉ.राहुल पाटील यांनी आरपी हॉस्पिटलला भेट देऊन जखमींची विचारपूस केली. यावेळी त्यांच्यासोबत स्वामी शिवेंद्र चैतन्य महाराज, जिल्हाप्रमुख रवींद्र धर्म उपस्थित होते त्यांनी जखमींच्या प्रकृतीची माहिती डॉक्टरांकडून घेतली तसेच त्यांच्या कुटुंबीयांशी संवाद साधून धीर दिला. दुर्घटनेतील जखमींना आवश्यक ते सर्व उपचार मिळावेत यासाठी प्रशासनाशी समन्वय साधला जाईल तसेच पीडितांना सर्व प्रकारची मदत उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे आश्वासन आमदार डॉ. राहुल पाटील यांनी दिले. या दुर्घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली असून मृतांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. प्रशासनाकडून मदत व बचावकार्य सुरू असून जखमींवर उपचार सुरू आहेत.

मानवत तालुक्यातील यशवाडी देवस्थान संस्थान मंदिरासमोरील सभागृहाचे छत शनिवारी दुपारी अचानक कोसळल्याने मोठी दुर्घटना घडली. या दुर्घटनेत ५० हून अधिक भाविक छताखाली अडकल्याची भीती व्यक्त केली जात असून बचावकार्य युद्धपातळीवर सुरू आहे.

दर शनिवारी यशवाडी देवस्थान येथे जिल्हाभरातून मोठ्या संख्येने भाविक दर्शनासाठी येत असतात. शनिवारीही दर्शन, कीर्तन आणि महाप्रसादासाठी मोठी गर्दी झाली होती. याचवेळी मुख्य मंदिरासमोरील सभागृहाचे छत अचानक कोसळल्याने परिसरात एकच खळबळ उडाली.

घटनेची माहिती मिळताच मानवत पोलिसांचे सहायक पोलीस निरीक्षक शिंदे हे पथकासह घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी परिसरात



बंदोबस्त ठेवत बचावकार्याला मदत सुरू केली आहे. तसेच अनेक म्बुलन्स घटनास्थळी पोहोचल्या असून जखमींना तातडीने उपचारासाठी हलविण्याचे काम सुरू आहे.

## रोखठोक

दिनेश गुणे

# जायचे ते खुशाल गेले...; पुढे काय?

का ही म्हणी किंवा वाक्प्रचार ही जीवनशैलीची अनुभवसिद्ध उदाहरणे असतात. शुक्रवारी महाराष्ट्राच्या राजकारणातील एक प्रसंग ज्यांनी पाहिला आणि ऐकला, त्यांना या वाक्प्रचाराच्या पुनरावृत्तीचा प्रत्यय निश्चितच आला असेल. १९ जून १९६६ या दिवशी, महाराष्ट्रातील मराठी माणसाच्या न्याय्य हक्कांसाठी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी स्थापन केलेल्या शिवसेनेच्या हीरक महोत्सवी वर्धापनदिनाचे दोन सोहळे शुक्रवारी, १९ जून २०२६ या दिवशी मुंबईत स्वतंत्रपणे साजरे झाले आणि बाळासाहेबांच्या हयातीतील शिवसेनेच्या इतिहासातील काही प्रसंगांची पुनरावृत्ती झाल्याचा प्रत्यय अनेकांस आला. मराठीत 'खुंटा हलवून बळकट करणे' असा एक वाक्प्रचार आहे. आपल्या अस्तित्वाचे अढळपद अधोरेखित करण्यासाठी किंवा आपल्या अस्तित्वाचे महत्त्व ओळखण्यासाठी काही वेळा जी कृती केली जाते, त्यासाठी हा वाक्प्रचार वापरला जातो. शिवसेनेच्या इतिहासात शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी काही वेळा याच कृतीचा वापर केला, पण त्या प्रत्येक वेळी त्यांच्या अस्तित्वाचे अढळपद अधिक ठळकपणे अधोरेखित झाले होते. शुक्रवारी मुंबईच्या षण्मुखानद सभागृहात शिवसेनेच्या उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाने आयोजित केलेल्या वर्धापन दिन कार्यक्रमात उद्धव ठाकरे यांनी बाळासाहेबांच्या त्याच कृतीची पुनरावृत्ती केली, पण त्यामध्ये आपल्या अस्तित्वाचे अढळपद अधोरेखित करण्याचा प्रयत्न कोठेच दिसला नाही. उलट, आपल्या अस्तित्वाचे महत्त्व जाणून घेण्याचा तो प्रयत्न असावा असेच अनेकांस वाटले असेल. बाळासाहेब ठाकरे यांनीही काही प्रसगांमुळे व्यथित होऊन शिवसेनाप्रमुखपद सोडण्याचा निर्णय जाहीर केला होता. उद्धव ठाकरे यांनी तसे केले नाही, पण पद सोडण्याची तयारी दाखवून खुंटा हलवून बळकट आहे किंवा नाही याची चाचपणी मात्र निश्चितच केली.

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे ते शिवसेना उबाठा गटप्रमुख उद्धव ठाकरे अशा वाटचालीतील या पुनरावृत्तीचा इतिहास जाणून घेण्यासाठी सुमारे पाच दशके मागे जावे लागेल. नोव्हेंबर १९७८ मध्ये झालेल्या मुंबई महापालिका निवडणुकीत शिवसेनेच्या ११७ उमेदवारांपैकी केवळ २१ उमेदवार विजयी झाले. शिवसेनेच्या बालेकिल्ल्यातच झालेल्या या दारुण पराभवामुळे बाळासाहेब व्यथित झाले आणि शिवाजी पार्क मैदानावरील लाखोंच्या जाहीर सभेत त्यांनी शिवसेनाप्रमुखपदाचा राजीनामा देण्याची घोषणा केली. 'आमुचा रामराम घ्यावा', अशा मथळ्याचा अग्रलेख 'मार्मिक' साप्ताहिकात लिहून आपल्या निर्णयामागील भूमिकाही त्यांनी स्पष्ट केली. तेव्हा 'मार्मिक'मधील प्रत्येक शब्दाकडे महाराष्ट्रात गांभीर्याने पाहिले जायचे. कारण त्यामध्ये प्रसिद्ध होणारे शब्द आणि प्रत्येक व्यंगचित्र केवळ विनोदी किंवा टोमणे नव्हते. बाळासाहेबांच्या विचारातून आणि कुंचल्यातून उतरलेल्या शब्दांनी आणि व्यंगचित्रांनी राजकारणाला चिमटे आणि बोचरे बोचकारे काढले. राजकारणातील व्यंगावर नेमके बोट ठेवत शब्दांचे आणि रेषांचे आसूड ओढले आणि समाजाला जागे करण्यासाठी प्रसंगी शब्दांचे फटकारेही मारले. त्यामुळे बाळासाहेबांनी स्वतःच शिवसेनाप्रमुखपद सोडण्याचा निर्णय जाहीर केल्यानंतर शिवसेनेत अक्षरशः हाहाकार माजला. मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत शिवसेनचा भगवा महापालिकेवर फडकला नाही तर आपण शिवसेना प्रमुखपदावरून दूर होऊ, असे त्यांनी त्याआधीच्या दसरा मेळाव्यात जाहीर केले होते. आयुष्यात आपण शब्दांची कदर करत असल्यामुळे ती प्रतिज्ञा करताना आपला विवेक शाबूत ठेवला होता, त्यामुळे निवडणुकीतील २१ जागांवरील विजय हा हुरळून जाण्यासारखा नसल्याने शब्दाला जागून आपण राजीनाम्याचा निर्णय घेतला, असे बाळासाहेबांनी स्पष्ट केले आणि शिवसैनिकांना भावनावेग अनावर झाला. त्या निर्णयानंतर शिवाजी पार्कवरील त्या सभेत एखादी वावटळ उठावी त्या त्वेषाने असंख्य श्रोते उभे राहिले. अनेक जण व्यासपीठाच्या दिशेने धावले आणि अनेकांनी व्यासपीठाला वेढा घालून गगनभेदी घोषणा देत बाळासाहेबांच्या निर्णयास विरोध सुरू केला. अनेकांना तर रडू अनावर झाले आणि 'आपला निर्णय आपल्या हातात नाही', याची जाणीव बाळासाहेबांना झाली. 'राजीनाम्याचा निर्णय जाहीर केल्यानंतर केवळ शाब्दिक कसरती करून तो फिरविण्याचा नादानपणा मला करायचा नव्हता, म्हणून अट्टहासाने शब्दाला जागून शिवतीर्थावर मराठी माणसाच्या चरणी आम्ही आमचा राजीनामा सादर केला, पण आपला निर्णय घेणेदेखील आपल्याला शक्य राहिलेले नाही असे लक्षात आल्याने लोकांच्या भावनेची कदर करून राजीनामा मागे घेतला', असे बाळासाहेबांनी त्या लेखात नमूद केले होते.

शिवसेनेच्या इतिहासातील प्रमुखपदाचा त्याग करण्याचा हा प्रसंग केवळ खुंटी हलवून बळकट करण्याचा किंवा आपल्या अढळपदाचा अबाधितपणा अनुभवण्याचा प्रयोग नव्हता, हे तेव्हा बाळासाहेबांच्या लाखो अनुयायांनीच सिद्ध करून दाखविले होते. बाळासाहेबांच्या नेतृत्वावरील शिवसैनिकांची अढळ श्रद्धा या प्रसंगाने अधोरेखित झाली आणि त्यांचे नेतृत्व तेजाळले. असे आणखीही काही प्रसंग बाळासाहेबांच्या नेतृत्वकाळात घडले. १९९२ मध्ये छगन भुजबळ यांनी शिवसेनेचा त्याग केला. शिवसेनेच्या इतिहासातील बंडखोरीचा हा सर्वांत मोठा, पहिला प्रसंग ठरला. त्याआधी हेमचंद्र गुप्ते यांनी पक्ष सोडला होता, पण ती फूट ठरली नव्हती. छगन भुजबळ यांच्या पक्षत्यागामुळे दुखावलेल्या बाळासाहेबांनी जुलै १९९२ मध्ये शिवसेनाप्रमुखपद सोडण्याची घोषणा केली. महाराष्ट्रात सर्वत्र शिवसैनिक रस्त्यावर उतरले. बाळासाहेबांना त्या निर्णयापासून परावृत्त करण्यासाठी ठिकठिकाणी आंदोलने झालीत आणि 'बाळासाहेबांशिवाय शिवसेना नाहीच' अशी ठाम भूमिका कार्यकर्त्यांनी घेतल्यावर पुन्हा बाळासाहेबांनी आपला निर्णय मागे घेतला. बाळासाहेबांचे नेतृत्व आणि पक्षावरील पकड निर्विवादपणे मजबूत झाली आणि नेतृत्वावरील भावनिक निष्ठा हा पुढे शिवसेनेचा मुख्य आधार ठरला. पक्षाच्या दृष्टीने ही एक जमेची बाजू असली, तरी अशाच प्रसंगांतून, नेतृत्वाभोवतीची व्यक्तिपूजनाची संस्कृतीदेखील विकसित झाली आणि नवे नेतृत्व विकसित होण्याच्या शक्यतादेखील संपुष्टात आल्या, हेदेखील याच इतिहासाने दाखवून दिले. पुढे नेतृत्वाच्या मुद्यावरूनच शिवसेनेत उफाळलेल्या वादामुळे व्यथित झालेल्या बाळासाहेबांना नेतृत्वाचे हस्तांतरण करण्याचा निर्णय घ्यावा लागला. हा शिवसेनेचा अत्यंत संवेदनशील काळ ठरला, पण त्यातून संघटनेत उत्तराधिकाराची प्रक्रिया सुरू झाली आणि उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वास अधिकृत रूप प्राप्त झाले. बाळासाहेबांनी राजीनामा किंवा पदत्याग हा शब्द अनेकदा संघटनात्मक शस्त्र म्हणून वापरल्याचे दिसते. परंतु तो केवळ सत्तेचा खेळ नव्हता, तर कार्यकर्त्यांच्या निष्ठेची चाचणी आणि पक्षसंघटन भावनिक धाग्याने बांधून पुन्हा एकत्र आणण्याचा व संघटना बळकट ठरण्याचे साधन ठरला होता. शिवसेनाप्रमुखपद सोडण्याचा निर्णय त्यांनी जेव्हा जेव्हा जाहीर केला किंवा बोलून दाखविला, त्या प्रत्येक वेळी त्यांचे नेतृत्व निर्विवाद ठरले आणि 'शिवसेना म्हणजे बाळासाहेब आणि बाळासाहेब म्हणजे शिवसेना' ही भावना अधिक बळकट होत गेली.

या प्रथेची पुनरावृत्ती पुढे अनेकदा उद्धव ठाकरे यांच्या कार्यकाळातही झालेली दिसते. माझे नेतृत्व मान्य नसेल तर सांगा, मी दूर होतो, असे सांगत उद्धव ठाकरे यांनी यापूर्वीही अनेकदा याच भावनिक शस्त्राचा वापर केला होता, पण त्यामागचे कारण वेगळे होते. उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वावर प्रश्नचिन्हे उमटवूनच पुढे पहिल्या फळीतील काही नेत्यांनी शिवसेना सोडली होती. उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वावर विश्वास नाही, हे अनेक नेत्यांनी जाहीरपणे बोलूनही दाखविले होते. जेव्हा जेव्हा शिवसेनेत अशी फूट पडली, तेव्हा तेव्हा उद्धव ठाकरे यांनी बाळासाहेबांच्या प्रयोगाची पुनरावृत्ती करण्याचा प्रयत्न केला होता, पण बाळासाहेबांसारखा प्रचंड भावनिक पाठिंबा त्यांच्या वाट्याला आलाच नाही. अनेकांनी नेतृत्वावर प्रश्नचिन्हे उमटवायची आणि मूठभरांनी निष्ठेचे प्रदर्शन करत पाठिंबा व्यक्त करायचा असेच अशा प्रसंगांतून दिसत राहिले. थोडक्यात, बाळासाहेबांच्या या शैलीचा पक्षावरील प्रभाव संपुष्टात आल्यानंतरही उद्धव ठाकरे पुन्हा पुन्हा त्याचा वापर करण्याचा प्रयत्न करत राहिले. बाळासाहेबांच्या या शैलीमुळे खरे तर, पक्षाची वैचारिक व संघटनात्मक ताकद नेतृत्वाच्या व्यक्तिमत्त्वावरच अवलंबून राहिली होती. त्यामुळे बाळासाहेबांच्या पश्चात उत्तराधिकाराचे आणि नेतृत्वाचे प्रश्न तीव्र स्वरूपात समोर येत राहिले. राज ठाकरे यांचा पक्षत्याग, त्यानंतरचे वेगवेगळे बंडखोरीचे प्रसंग आणि अखेरीस एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील बंडामुळे उद्धव ठाकरेंच्या नेतृत्वशैलीच्या भविष्यावरच उमटलेले प्रश्नचिन्ह या सर्वांची बीजे काही प्रमाणात संघटनेच्या नेतृत्वकेंद्रित रचनेत शोधता येतात. पदत्यागाचे इशारे म्हणजे आपल्या नेतृत्वाचा अढळपणा अबाधित राखण्याचे प्रयत्न असा एक वेगळाच अर्थ त्यामागे दडल्याची भावना निर्माण होऊ लागली.

बाळासाहेबांच्या पदत्यागाच्या घोषणांनी अल्पकालीन संघटनात्मक एकजूट वाढविली, पण कदाचित त्यामुळेच संघटनेतील संस्थात्मक नेतृत्वनिर्मितीच्या प्रक्रियेला मर्यादा आल्या असाव्यात. त्यामुळे, ही शैली दीर्घ कालाकरिता प्रभावी राहिलेली नाही. उद्धव ठाकरे यांनी शिवसेनेच्या वर्धापनदिन कार्यक्रमात त्याचा वापर केला, तेव्हा त्यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करणाऱ्या निष्ठावंतांनी त्यास विरोध जरूर केला, पण साठ वर्षांच्या वाटचालीपैकी गेल्या २३ वर्षांत शिवसेनेबाहेर जाणाऱ्यांच्या प्रवाहाचा जोरदार वेग रोखण्याऐवजी धरणाचे दरवाजे उघडून प्रवाहास बाहेरची वाट करून देण्याचेच धोरण अधिक प्रभावीपणे राबविले गेले. २००३ मध्ये शिवसेनेच्या महाबळेश्वर शिबिरात संघटनेमध्ये कार्यकारी प्रमुखपद निर्माण करण्यात आले आणि लगोलग उद्धव ठाकरे यांची या पदावर एकमताने निवड करण्यात आली. त्याआधीच्या वर्षात उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेने राज्यात सत्ताधाऱ्यांविरोधात 'चालते व्हा' आंदोलन गाजविले होते. २००५ मध्ये उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेने कामाला जोरदार सुरुवात केली आणि त्याच वर्षी नारायण राणे यांनाच 'पक्षातून चालते व्हा' असा आदेश देण्यात आला. उद्धव ठाकरेंच्या नेतृत्वावर जोरदार टीका करत राणे शिवसेनेतून बाहेर पडले आणि संघटनेच्या गळतीला सुरुवात झाली. २००६ मध्ये राज ठाकरे यांनीही उद्धव ठाकरे यांना लक्ष्य करत शिवसेनेला सोडचिठ्ठी देऊन नवा पक्ष स्थापन करण्याची घोषणा केली. त्यानंतर जेव्हा जेव्हा पक्षात फूट पडली, बाळासाहबांचे निष्ठावंत कार्यकर्तेदेखील पक्षाला सोडचिठ्ठी देऊन उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वावर टीका करू लागले, तेव्हा तेव्हा, 'जाणाऱ्यांनी खुशाल जावे' असाच पवित्रा उद्धव ठाकरे यांनी घेतल्याचे दिसते. शिवसेनेसमोरील संकटाचा सामना करण्यासाठी आपण पहाडासारखे एकटेच उभे राहू, हा उद्धव ठाकरेंचा फुकाचा आत्मविश्वास हेच त्याचे कारण असावे.

महाराष्ट्राने शिवसेनेला मनापासून साथ दिली होती. स्वबळावर राज्याची सत्ता मिळाली नाही, तरी मंत्रालयावर भगवा फडकावण्याच्या बाळासाहेबांच्या स्वप्नास १९९५ मध्ये महाराष्ट्रातील जनतेने साथ दिली होती. शिवसेना आणि भाजप ही नैसर्गिक युती आहे आणि ती काही निश्चित विचारांशी बांधील आहे, हे युतीचे सूत्र जनतेनेही मान्य केले होते. त्यामुळेच, युती म्हणून लढविलेल्या सर्व निवडणुकांतील शिवसेना आणि भाजपचे यश महाराष्ट्राच्या राजकारणावर प्रभाव टाकून राहिले होते. अगोदरच उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वावर आक्षेप असलेल्या नेत्यांनी पक्षाला सोडचिठ्ठी देण्याचा सपाटा लावल्याने कमकुवत होत गेलेला शिवसेनेचा तंबू, २०१९ मधील निवडणुकीनंतर बदललेल्या राजकारणामुळे अधिकच डळमळीत झाला होता. काँग्रेस-राष्ट्रवादीसोबत सत्ता स्थापन करण्याच्या उद्धव ठाकरे यांच्या निर्णयास वैधानिकदृष्ट्या नाकारता येत नसले, तरी महाविकास आघाडीसोबत जाण्याच्या राजकारणावर नैतिकदृष्ट्या काही प्रश्नचिन्हे उमटलीच होती. ठाकरे यांच्या या निर्णयामुळेच शिवसेनेतील बाळासाहेबांच्या निष्ठावंतांच्या जाणिवा दुखावल्याचे वारंवार स्पष्टदेखील होत गेले आहे. आज महाराष्ट्रात जनतेने दिलेला कौल पाहता, बाळासाहेबांच्या शिवसेनेवरील ठाकरे परिवाराचे वर्चस्व जवळपास संपुष्टात आल्यासारखी स्थिती दिसते. शुक्रवारी दोन वेगवेगळ्या कार्यक्रमांत शिवसेनेचा वर्धापनदिन मुंबईत साजरा झाला, तेव्हा एका बाजूला पक्षाचा जुना दमदार आवाज उमटत होता, तर दुसरीकडे मात्र, उद्विग्न आणि अपयशाची खंत उमटताना दिसत होती. आता ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील पक्ष हा केवळ एका गटापुरता मूठभर उरला आहे. तो पुन्हा उभा करण्याचे आव्हान सोपे नाही. बाळासाहेबांचा करिष्मा असेपर्यंतच शिवसेनेवर उद्धव ठाकरे यांचे वर्चस्व राहील आणि तोपर्यंतच त्यांचे नेतृत्व अबाधित राहील, त्यानंतर मात्र काळासोबत त्यांचा प्रभाव कमी होत जाईल, असे भाकीत सुमारे दोन दशकांपूर्वी, ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक दत्ताजी ताम्हणे यांनी वर्तविले होते. बाळासाहेबांचा प्रभाव असलेला मोठा वर्ग आता ठाकरेंच्या गटापासून दुरावला आहे. बाळासाहेबांनी आपल्या झंझावाती प्रचारशैलीने आणि आक्रमक विचारांनी त्यांच्या काळातील तरुणांची मने जिंकली होती. ती पिढी आता जुनी झाली. आताच्या तरुणांवर बाळासाहेबांसारखा प्रभाव टाकणारे नेतृत्व ठाकरे गटाकडे नाही, हे वास्तव आहे. कालपरवा केवळ आभासी मंचावर स्थापन झालेल्या झुरळ जनता पार्टीने देशातील तरुणाईला आकर्षित करून राजकारणास त्यांची दखल घेणे भाग पाडले होते. ठाकरे गटाच्या नेत्यांसमोर तेदेखील एक मोठे आव्हान आहे. केवळ 'जायचे त्यांनी खुशाल जावे' ही ठाकरेंच्या राजकारणाची नीती असताना, दुसरीकडे मात्र, अन्य राजकीय पक्षांत दाखल होणाऱ्यांसाठी पायघड्या घातल्या जात आहेत. बेरजेला महत्त्व असलेल्या जमान्यात वजाबाकीचे राजकारण कितपत यशस्वी होईल यावर ठाकरे यांच्या नेतृत्वाचा कस लागणार आहे. कारण त्यांच्या पक्षाचे दरवाजे उघडे असले, तरी त्यातून बाहेर पडण्याचीच मुभा दिली गेली आहे. ■

dineshgune@gmail.com

## रविवारची पत्रे

### नियमित योगसाधना करावी

भारतीय प्राचीन संस्कृतीत योग, योगासने, योगसाधना यांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. प्राचीन काळापासून भारतातल्या साधुसंत, ऋषिमुनींनी योगाचे महत्त्व, त्याचे फायदे आणि त्याची गरज पटवून दिली आहे. तन आणि मन यांचा एकत्रित व्यायाम म्हणजे योग. आजच्या काळातील धकाधकीच्या जीवनात योगाच्या माध्यमातून आपण आपले शरीर तंदुरुस्त ठेवू शकतो; शिवाय मनावरही चांगले संस्कार करू शकतो. भारतातील योगाची संस्कृती जागतिक पातळीवर स्वीकारली गेली आहे. जगभरातील देशांनी योग केवळ स्वीकारला नाही, तर त्याचा प्रचार आणि प्रसारही केला आहे. कोरोनारूपी महामारीच्या काळात तर योगदिनाला विशेष महत्त्व प्राप्त झाले होते. कोरोनासारख्या महामारीचा मुकाबला करायचा असेल तर आपल्या शरीरातील रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यावर भर दिला पाहिजे. नियमित व्यायाम आणि योगासन यांनी आपली रोगप्रतिकारक शक्ती वाढू शकते. योग कसा करावा, कोणती योगासने मनाला आणि शरीराला सक्षम ठेवू शकतात यावर अभ्यासकांनी मते मांडली आहेत. त्याप्रमाणे दररोज योगसाधना करणे गरजेचे आहे. आज योगदिनानिमित्त एक दिवस योग करून त्याचे फोटो सोशल मीडियावर टाकून या दिनाचा इव्हेंट न करता सर्वांनी योगाचा अंगीकार करून नियमित सराव करावा. जगाने योगाला राजमान्यता दिली आहे. आपणही नियमित सराव ठेवून योगसाधना केली तरच आजच्या योगदिनाचे सार्थक झाले असे म्हणावे लागेल.




**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

* * *

### श्री देवनाथ मठ; एक दिवसीय भक्ती-सफर

आजच्या धकाधकीच्या प्रवासात मनाला शांती देणारे क्षण दुर्मिळ होत चालले आहेत. अशातच माझे स्नेही अंजनगाव सुर्जी निवासी (हल्ली मुक्कामी पुणे) यांचा मला फोन आला... ''मी अंजनगावला आलो असून येथे अधिकमासानिमित्त श्रीमद्भागवत कथा ज्ञानयज्ञ सप्ताहाचे आयोजन केले आहे; तू उद्या येतोस का?'' मित्राच्या या आपुलकीच्या आग्रहाला मी क्षणाचाही विलंब न लावता लगेच होकार दिला आणि एका दिवसाची आध्यात्मिक सफर आणि अद्भुत कथाश्रवणाचा योग जुळून आला. अमरावतीवरून अंजनगाव सुर्जीसाठीचे अंतर ८३ किलोमीटरचे आहे. अंजनगाव आणि सुर्जी ही दोन गावे मिळून आता 'अंजनगाव सुर्जी' हे एकच नाव रूढ झाले आहे. हे एक अत्यंत सधन गाव म्हणून गणले जाते. येथील बारमाही बागायती शेती, केळी आणि संत्र्यांचे मळे गावाची समृद्धी अधोरेखित करतात. जवळच शहानूर नदीवर मोठे धरण आहे.



गावाच्या समृद्धीला जोड आहे ती येथील थोर संतांच्या आध्यात्मिक वारशाची. पैठणचे सुप्रसिद्ध सत्पुरुष आणि थोर संत श्री एकनाथ महाराज यांच्या शिष्य परंपरेतील महान संत श्री देवनाथ महाराज यांचा जन्म अंजनगाव येथेच झाला होता. त्यांनी इ. स. १७५४ मध्ये येथे 'श्री देवनाथ मठाची' स्थापना केली. याच पवित्र परंपरेतील १८ वे महापुरुष श्री मनोहरनाथ महाराज यांच्यानंतर सध्या आचार्य स्वामी श्री जितेंद्रनाथ महाराज हे या पीठाची गादी सांभाळत असून त्यांच्याच मार्गदर्शनाखाली हा सोहळा सुरू आहे.

बसस्थानकावरून आम्ही थेट मठात गेलो. मठाचा परिसर अत्यंत विस्तीर्ण, शांत आणि मनाला प्रसन्न करणारा रमणीय शहानूर (शरनीरा) नदीच्या तीरावर आहे. या ठिकाणी भगवान श्री हनुमंत गर्भात असताना काही काळ अंजनी मातांनी येथील शरनीरा नदीकाठजवळील मंदिर परिसरातील पिंपळाच्या वृक्षाजवळ तपस्या केली होती, अशी आख्यायिका आहे. येथील मंदिरातील श्री माधव मंजिरी यांची अत्यंत नयनमनोहारी मूर्ती मनाला भुरळ पाडतात. बाहेरगावाहून येणाऱ्या शेकडो भक्तांसाठी मठात महाप्रसादाची उत्तम व्यवस्था केली जाते. आम्हीही या पवित्र प्रसादाचा आस्थेने लाभ घेतला. विदर्भातील उन्हाळ्याचे दिवस असल्याने कथेची वेळ सायंकाळची ठेवण्यात आली होती. या ज्ञानयज्ञात आचार्य स्वामी श्री जितेंद्रनाथ महाराज यांनी श्रीमद्भागवत महापुराणाच्या ७ व्या स्कंधातील ८ व्या अध्यायावर आधारित नरसिंह अवताराची कथा निरूपण केली. भगवान विष्णूंचा चौथा अवतार असलेला नरसिंह अवतार, बालभक्त प्रल्हादाची अढळ भक्ती आणि हिरण्यकश्यपूचा वध... हा संपूर्ण प्रसंग महाराजांनी आपल्या रसाळ आणि सुश्राव्य वाणीतून, संगीतमय पद्धतीने इतका जिवंत केला की, श्रोते मंत्रमुग्ध झाले होते. महाराजांच्या मुखातून ती अमृतवाणी ऐकताना 'ही कथा अशीच सुरू राहावी, कधी संपूच नये' असा भाव प्रत्येक भक्ताच्या मनात दाटून आला होता.

कथा समाप्तीनंतर जितेंद्रनाथ महाराजांचे दर्शन घेऊन आणि मनात एक अनोखी ऊर्जा घेऊन आम्ही मठाबाहेर पडलो. मित्राच्या एका फोनमुळे लाभलेली ही 'एक दिवसीय भक्ती-सफर' आणि इतिहास प्रसिद्ध मठाची भेट माझ्या स्मरणात कायमची कोरली गेली आहे.

**अविनाश देशपांडे**/पुणे

* * *

### समाजाची यशाची व्याख्या आणि तणावग्रस्त तरुणाई

''महागडा फोन, मोठा पगार, आलिशान घर, चारचाकी गाडी आणि प्रतिष्ठित नोकरी'' हीच आजच्या समाजाने यशाची व्याख्या ठरवून दिली आहे. लहानपणापासूनच मुलांच्या मनावर या यशाचे चित्र कोरले जाते. परिणामी स्वतःची आवड, क्षमता आणि स्वप्ने यांना दुय्यम स्थान मिळते. स्पर्धा परीक्षांचे वाढते महत्त्व, पालकांच्या अपेक्षा, समाजाची तुलना आणि आर्थिक सुरक्षिततेची चिंता यामुळे आजची तरुणाई प्रचंड तणावाखाली जगत आहे. यशाच्या मागे धावताना अनेक तरुण स्वतःलाच हरवून बसत आहेत.

आजचे युग स्पर्धेचे युग म्हणून ओळखले जाते. शिक्षण, नोकरी, करीयर आणि आर्थिक प्रगतीसाठी प्रत्येक क्षेत्रात तीव्र स्पर्धा निर्माण झाली आहे. अनेक विद्यार्थ्यांचे जीवन कोचिंग क्लास, टेस्ट सीरिज आणि अभ्यास यांच्याभोवती फिरत आहे. जेईई, नीट, यूपीएससी यांसारख्या परीक्षांसाठी वर्षानुवर्षे मेहनत घेतली जाते. या परीक्षांमध्ये यश मिळविण्यासाठी लाखो युवक-युवती दिवस-रात्र मेहनत घेत असतात. मात्र प्रत्येकाला यश मिळतेच असे नाही. काही विद्यार्थ्यांना आर्थिक अडचणी, कौटुंबिक जबाबदाऱ्या, वेळेचा अभाव, सामाजिक दबाव किंवा इतर अनेक कारणांमुळे आपल्या स्वप्नांचा त्याग करावा लागतो. अशा परिस्थितीत समाजाने ठरवून दिलेल्या यशाच्या व्याख्येमुळे तरुणाईवर मानसिक तणावाचे मोठे ओझे निर्माण होत आहे. या प्रक्रियेत त्यांचे छंद, खेळ, कला आणि आनंदाचे क्षण हरवून जातात. पालकांच्या आणि समाजाच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी विद्यार्थी सतत धडपडत असतात. प्रत्येक परीक्षेत यश मिळविण्याची सक्ती, गुणांची तुलना आणि अपयशाची भीती यामुळे अनेक तरुण मानसिक तणाव, नैराश्य आणि आत्मविश्वासाच्या कमतरतेला सामोरे जातात.

आज एखाद्या व्यक्तीचे मूल्य तिच्या उत्पन्नावर किंवा पदावर ठरवले जाते. मात्र पैसा मिळाला म्हणजे आनंद मिळेलच असे नाही. आर्थिक यश असूनही अनेक जण मानसिक समाधान, कौटुंबिक आनंद आणि अंतर्मनाची शांतता गमावून बसतात. ज्या व्यक्तीला चित्रकला, साहित्य, संगीत, क्रीडा किंवा समाजसेवा यांसारख्या क्षेत्रांत करीअर करण्याची इच्छा असते अशा अनेक तरुणांना 'यात भविष्य नाही' असे सांगितले जाते. परिणामी ते स्वतःच्या आवडीचा त्याग करून दुसऱ्यांच्या स्वप्नांचे ओझे वाहू लागतात. समाज यशस्वी व्यक्तींचा गौरव करतो, पण अपयशी व्यक्तींच्या संघर्षाकडे दुर्लक्ष करतो. त्यामुळे अपयश आले की अनेक तरुण स्वतःला कमी लेखू लागतात. प्रत्यक्षात अपयश ही शिकण्याची आणि अधिक सक्षम होण्याची संधी असते.

यशाची खरी व्याख्या प्रत्येक व्यक्तीसाठी वेगळी असते. केवळ पैसा, पद आणि प्रतिष्ठा यालाच यश मानणे योग्य नाही. ज्या क्षेत्रात व्यक्तीला आनंद, समाधान आणि आत्मिक शांतता मिळते, तेच त्यांच्यासाठी खरे यश असते. त्यामुळे पालक, शिक्षक आणि समाजाने तरुणांच्या आवडीनिवडी समजून घेऊन त्यांना योग्य दिशा देणे आवश्यक आहे. प्रत्येकाला स्वतःचे स्वप्न जगण्याचा अधिकार आहे. कारण आयुष्य केवळ यशस्वी होण्यासाठी नसते, तर समाधानी आणि आनंदी होण्यासाठीही असते. समाजाने यशाची व्याख्या बदलण्याची वेळ आता आली आहे. प्रत्येक व्यक्तीचे यश हे त्याच्या समाधानात, आनंदात आणि स्वप्नपूर्तीत दडलेले असते. पैसा आणि प्रतिष्ठा महत्त्वाची असली तरी मानसिक शांतता, आत्मसंतोष आणि जीवनातील आनंद याहून मोठे यश दुसरे नाही. तरुणांना त्यांच्या क्षमतेनुसार आणि आवडीनुसार वाटचाल करण्याचे स्वातंत्र्य मिळाले, तरच खऱ्या अर्थाने सक्षम, आनंदी आणि सुदृढ समाजाची निर्मिती होईल.

**उर्वशी मनीष संघवी**/मूर्तिजापूर, जि. अकोला

* * *

### फूटपाथवर चालणे हा मूलभूत अधिकार



वरील मथळ्याची बातमी प्रसिद्ध झाली आहे. पण पुण्यात अनेक ठिकाणी फूटपाथच नाहीत. जेथे फूटपाथ आहेत तेथे ते मोकळे नाहीत. फेरीवाल्यांच्या अतिक्रमणाने व्यापून टाकलेत. माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार महानगरपालिकेने फूटपाथ मोकळे करून पादचाऱ्यांना सुविधा उपलब्ध करून दिली पाहिजे. ज्या ठिकाणी फूटपाथच नाहीत तेथे नवीन फूटपाथ तयार केले पाहिजेत. काही ठिकाणी फूटपाथ दुरुस्त करण्याची आवश्यकता आहे. महानगरपालिकेच्या वतीने प्रत्येक प्रभागात याविषयी सर्वेक्षण करून 'फूटपाथ - नागरिकांचा मूलभूत अधिकार' हे अभियान सुरू केले पाहिजे. यामुळे विशेष करून ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग नागरिक, महिला, शालेय विद्यार्थ्यांना सुविधा उपलब्ध होईल. माननीय महापौर, नगरसेवक, लोकप्रतिनिधींनी याबाबत पाठपुरावा करावा, ही विनंती.

**मोहन रानडे**/पुणे. ९८२३३७५३००

* * *

### कॉक्रोच पिल्लू कोणाचे?

मागील काही दिवसांपासून कॉक्रोच नावाचा एक किडा खूप वळवळ करताना दिसत आहे. हा किडा अचानक कसा आणि कुठून जन्माला आला आणि त्याच्यामागे कोण आहेत, हे कुणाचे कटकारस्थान आहे, याचा शोध तपास संस्थांनी लावलाच पाहिजे. काही दिवस मागे जाऊन पाहिले असता एक गोष्ट मात्र स्पष्टपणे दिसून येते. जेव्हा पश्चिम बंगालच्या निवडणुकीचा निकाल आला आणि ममता बॅनर्जी यांचा दारुण पराभव झाला आणि काँग्रेसचे तर नामोनिशाणसुद्धा राहिले नाही. त्यानंतरच्या घडामोडींकडे सूक्ष्मपणे बघितले असता काही गोष्टी सहजपणे दिसून येतात. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी देशवासीयांना पेट्रोल, डिझेलचा वापर काटकसरीने करण्याचे आवाहन केले. त्यानंतर मोदीविरोधकांचे ओरडणे सुरू झाले. सोशल मीडियावर मोदींवर टीकास्त्र सोडले जाऊ लागले. नंतर नरेंद्र मोदी पाच देशांच्या दौऱ्यावर गेले असताना त्यांच्यावर टीका करणे सुरू झाले.

या दौऱ्यात सगळ्याच देशांमध्ये मोदींचे ज्या प्रकारे स्वागत आणि सन्मान करण्यात आला, त्यामुळे तर मोदीविरोधकांची भयंकर जळफळाट झाला. ज्यावेळी मोदी दौऱ्यावर होते, त्याच वेळेस राहुल गांधी सुद्धा कुठल्यातरी विदेश दौऱ्यावर गेले होते. ते कोणत्या देशात गेले आणि कशासाठी गेले हे कुणालाच माहीत नाही. तिथून परतल्यानंतर राहुल गांधी यांनी जेन झीला भडकवणे सुरू केले आणि एक वर्षातच मोदी सरकार कोसळणार असल्याचे वक्तव्य करणे सुरू केले. त्यानंतर काही दिवसातंच अचानक कॉक्रोचचा जन्म झाला. या किड्याच्या जन्मामागे राहुल गांधी यांचा तो विदेश दौरा तर कारणीभूत नव्हता ना अशी शंका घेण्यास वाव आहे. म्हणून आता तपास संस्थांनी खोलात जाऊन या प्रकरणाचा तपास करायला हवा आणि हा कॉक्रोच कुणाचे पिल्लू आहे आणि त्याच्यामागे कोणते कटकारस्थान शिजलेले आहे त्याचा भंडाफोड करायलाच हवा. ■

**संजीव हेडाऊ**/९३७०१६९५८२

# ज्ञानस्त्रोताचे जाणे...

## स्मरण

पा णी, सिंचन, शिक्षण, शिक्षक, पदवीधर, मूलभूत सुविधा, शेतकरी, कृषी या विषयांवर वाचन, मनन, चिंतन व संशोधन करून लोकहिताची मांडणी करणारा प्रा. बी. टी. अर्थात भाऊराव तुळशीराम देशमुख यांच्या रूपाने लाभलेला ज्ञानस्त्रोत काळाच्या पडद्याआड गेला आहे. बी. टी. म्हणजे चालते बोलते विद्यापीठ होते. उपरोक्त सर्व विषयांची विश्वासार्ह माहिती त्यांना मुखोद्गत असायची किंवा लिखित स्वरूपात तर त्यांच्याकडे असायचीच! उर्वरित महाराष्ट्रापेक्षा विदर्भातला सर्वच क्षेत्रातला विकासाचा अनुशेष किती मोठा आहे, हे त्यांनीच पहिल्यांदा आकडेवारीसह लक्षात आणून दिले. राज्यातल्या विकासाचा प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठी राज्यघटनेने राज्यपालांना दिलेले विशेष अधिकार त्यांनी वापरले पाहिजे आणि सरकारला त्यासाठी बाध्य केले पाहिजे, यासाठी ते कायम आग्रही होते. या अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नावर त्यांनी विदर्भातील नितीन गडकरी, देवेंद्र फडणवीस यासारख्या अभ्यासू नेत्यांना एकत्र आणण्याचा कायम प्रयत्न केला. त्यांच्या प्रयत्नांना यशही आले. नितीनजी आणि देवेंद्रजींनी अनुशेषाचा मुद्दा त्यांच्याकडून समजून घेत सभागृहात वेळोवेळी आवाज बुलंद केला. राज्यातील मागासलेल्या भागाला वंचित ठेवून प्रगत भागात निधी खेचून नेणाऱ्यांवर त्यांनी नेहमीच प्रहार केला. त्यांची मांडणी इतकी वस्तुनिष्ठ असायची की, सत्ताधाऱ्यांना काय बोलावे हेच कळायचे नाही. बी. टीं.चे विधिमंडळातील तारांकित प्रश्न व लक्षवेधी संबंधित मंत्र्यांची एक प्रकारे परीक्षाच असायची. अनेक मंत्र्यांना त्यांनी निरुत्तर केल्याची खूप उदाहरणे आहेत.



अमरावती शहराजवळच्या नांदगाव पेठ औद्योगिक वसाहतीत तेव्हाच्या कोळशावर आधारित सोफिया आणि आताच्या रतन इंडिया औष्णिक विद्युत प्रकल्पासह विदर्भातल्या अन्य तीन अशाच प्रकल्पां विरोधातला बी. टीं.नी उभारलेला लढा जवळून पाहता आला. हे औष्णिक प्रकल्प सिंचन, शेती, पिण्याचे पाणी आणि आरोग्यासाठी कसे धोकादायक आहे, हे त्यांनी लेखी स्वरूपात शासन, प्रशासन व नागरिकांपर्यंत पोहोचविले होते. विरोधाची ही चळवळ भक्कम करण्यासाठी तेव्हा विदर्भ सिंचन अनुशेष निर्मूलन समितीच्या 'हेल्पलाईन'ची स्थापना करण्यात आली होती. या हेल्पलाईनच्या माध्यमातून बी. टी. आणि पद्मश्री प्रभाकरराव वैद्य व त्यांच्या असंख्य सहकाऱ्यांनी हा लढा खूप तीव्र केला होता. संवैधानिक मार्गाने आंदोलनाचे वेगवेगळे टप्पे आखले होते. त्यानुसार सगळी आंदोलने झाली. त्याची दखल शासनाला घ्यावी लागली. सोफिया वगळता विदर्भातले अन्य तीन औष्णिक प्रकल्प शासनाने रद्द केले. सोफिया हद्दपार होऊ शकला नाही, याची खंत त्यांना शेवटपर्यंत होती. पण, या लढ्याच्या माध्यमातून सिंचनासह अन्य क्षेत्रातला विदर्भातल्या अनुशेषाचा मुद्दा तळागळापर्यंत पोहोचला. परिणामी शासनाने अनुशेष कमी करण्याचा प्रयत्न केला. भाजपाच्या गेल्या दहा वर्षातल्या सत्ताकाळात तो वेगाने कमी होत आहे.

पेशाने शिक्षक राहिलेले बी. टी. देशमुख दूरदृष्टीचे नेते होते. अमरावती शहराला पिण्याच्या पाण्याची आणि अनेक गावांना पिण्यासह सिंचनाला पाणी मिळावे म्हणून त्यांनी वर्धा नदीवर मोर्शी जवळ अप्पर वर्धा धरण उभारण्यासाठी स्थानिकांचा विरोध झुगारून प्रामाणिक प्रयत्न केले. त्यांच्या प्रयत्नानेच हे धरण तयार झाले. अनेक गावांची तृष्णातृप्ती झाली व हजारो हेक्टर जमीन सिंचनाखाली आली. हा भाग आता समृद्ध आहे. अमरावती जवळच्या पेढी नदीवरील धरणाला सुद्धा विरोध होता. बी. टी भविष्यातली तरतूद म्हणून या धरणासाठी कायम आग्रही राहिले. अखेर ते धरण आता अंतिम टप्प्यात आले आहे. शिक्षण आणि शिक्षक हा तर त्यांचा मूळ विषय होता. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोलाच्या स्थापनेत त्यांचा मोलाचा वाटा होता. नागपूर युनिव्हर्सिटी टीचर्स असोसिएशनचे (नुटा) ते संस्थापक अध्यक्ष होते. या संघटनेच्या माध्यमातून त्यांनी सरकारला अनेक शैक्षणिक सुधारणा करण्यास बाध्य करून शिक्षकांच्या अनेक समस्या सोडविल्या. ते स्वतः संपादक असलेल्या नुटा बुलेटिनच्या माध्यमातून असंख्य विषय त्यांनी मांडले. शासनाने त्याची वेळोवेळी दखल सुद्धा घेतली.

प्रशासकीय कामकाजातल्या किंवा शासन आदेशातल्या त्रुटी शोधून त्या संबंधितांसाठी कशा अडचणीच्या ठरत आहेत, हे त्यांनी वेळोवेळी चव्हाट्यावर आणले. त्या त्रुटी दूर करण्यास त्यांनी शासनाला बाध्य केले आणि ज्या झाल्या नाहीत त्यासाठी आमदारकीचा राजीनामा देण्याची ताकदही त्यांनी दाखविली होती. त्यांचा विधिमंडळाचा ३० वर्षांचा कार्यकाळ सुवर्ण अक्षरात नोंदविला गेला आहे. त्यांची अभ्यासपूर्ण भाषणे आजही उपयुक्त आहेत. बी.टीं.नी आपले कार्य कागदावर नोंदवून यासाठी ठेवले की, ते पुढील पिढीसाठी उपयोगी पडेल. संसदपटू कसा असावा याचे मूर्तिमंत उदाहरण बी. टी. आहेत. नवीन आमदार व खासदारांनी आदर्श म्हणून बी.टीं.ची कार्यपद्धती अभ्यासली पाहिजे. आयुष्यभर शिस्त पाळून व्रतस्थ जीवन जगणाऱ्या बी. टी. देशमुख यांच्यासारखी माणसे पुन्हा उदयास येणे अवघड आहे. केलेल्या अनमोल कार्यासाठी ते कायम स्मरणात राहतील. ज्ञानस्त्रोत बी. टीं.ना भावपूर्ण श्रद्धांजली! ■

**गिरीश शेरेकर**/९४२०७२१२२५

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.

प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87

stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# योग ही भारताने जगाला दिलेली अमूल्य देणगी- विवेक गायकवाड






**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २१ जून**

योग ही भारताने जगाला दिलेली अमूल्य देणगी असून निरोगी व संतुलित जीवनासाठी योगाचा अंगीकार करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांनी केले.

शहरातील संत नामदेव पोलीस कवायत मैदानावर जागतिक योग दिना निमित्त योगाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. बाराव्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त येथील संत नामदेव पोलीस कवायत मैदानावर जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हास्तरीय योग शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हा प्रशासन, पोलीस प्रशासन, क्रीडा विभाग, शिक्षण विभाग, योग विद्याधाम, पतंजली योग समिती तसेच विविध सामाजिक संस्था व मंडळांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम पार पडला.

या कार्यक्रमास उपमुख्य कार्यकारी अधिकारी समृद्धी दिवाने, पोलीस उपअधीक्षक दत्ता केंद्रे, मयूर रसाळ, शिक्षणाधिकारी विपुल भागवत, क्रीडा अधिकारी आत्माराम बोथीकर, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रविंद्र पुरी, योग शिक्षक रत्नाकर महाजन, पतंजलीचे कुंडलिकराव निर्मले, ज्योती वाघमारे, शितलताई तापडिया आदींची प्रमुख उपस्थिती होती.

योगगुरु रत्नाकर महाजन यांनी उपस्थितांना योगाचे महत्त्व पटवून देत प्रत्येकाने आपल्या मित्रपरिवार व कुटुंबीयांमध्ये योगाविषयी जनजागृती करण्याचे आवाहन केले. तसेच त्यांनी विविध योगासने व प्राणायामाचे प्रात्यक्षिक करून उपस्थितांकडून सराव करून घेतला.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांनी सर्व उपस्थितांना नियमित योगाभ्यास करण्याची शपथ दिली. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून योग शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. या योग शिबिरास विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी, योगाभ्यासी मंडळांचे सदस्य तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मोदी सरकारच्या १२ वर्षांच्या यशस्वी कार्यकाळानिमित्त आयोजित 'विकास आणि जनकल्याण अभियान' अंतर्गत आज भारतीय जनता पक्षाच्या वतीने हिंगोली शहरातील अथर्व लॉन येथे आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला भाजपचे ज्येष्ठ नेते तथा राज्यसभा खासदार रामाराव वडकुते, जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, संयोजक फुलाजीराव शिंदे, भाजप युवामोर्चाचे जिल्हाध्यक्ष शिवाजीराव मुटकुळे, युवा नेते शशिकांत वडकुते, राजामतीताई मुटकुळे यांच्यासह उमेश नागरे, विलास गोरे, रजनीश पुरोहीत, कृष्णा रुहाटिया, रेखाताई अग्रवाल, माणीक लोडे, पवन उपाध्ये, ॲड.अमोल जाधव, नितीन राठौर, रेश अग्रवाल, अमित रुहाटिया, राहुल शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

५२ महाराष्ट्र बटालियनच्या वतीने आज हिंगोली शहरातील शिवाजी पुतळा परिसरात आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कर्नल रेड्डी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमात १७३ छउउ कॅडेट्सनी सहभाग नोंदवला. योग गुरू प्रा. डॉ. सुरेश लेकुळे यांनी कॅडेट्सना योगाचे महत्त्व समजावून सांगत विविध योगासने व प्राणायामाचे प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले. कॅडेट्सनी शिस्तबद्धपणे योग साधना केली. या कार्यक्रमात हिंगोली येथील आदर्श महाविद्यालय, सरजुदेवी भिकुलाल भारूका आर्य कन्या विद्यालय, माणिक स्मारक विद्यालय आणि जिल्हा परिषद बहुविध प्रशाला या शाळा-महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

येथील आदर्श महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. भारतासह जगभरात आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात आज साजरा करण्यात आला. निरोगी जीवनशैली, मानसिक स्वास्थ्य आणि शारीरिक तंदुरुस्तीचा संदेश देणाऱ्या या दिनानिमित्त आदर्श महाविद्यालयात प्राचार्य डॉ.प्रो.विलास आघाव यांच्या अध्यक्षतेखाली हा दिवस साजरा करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. प्रो. संजीवकुमार नरवाडे, राष्ट्रीय सेवा योजनाचे कार्यक्रम अधिकारी डॉ.प्रा. सचिन हटकर, डॉ. तुकाराम हापगुंडे व क्रीडा विभागाचे विभाग प्रमुख डॉ. प्रा.आनंद भट्ट,डॉ अण्णा मडावी तसेच महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी हे बहुसंख्येने सामूहिक योगाभ्यासात सहभागी होते. सकाळच्या प्रसन्न वातावरणात आयोजित कार्यक्रमांमध्ये शारीरिक सूक्ष्म हालचाली, विविध योगासने, प्राणायाम, ध्यानधारणा यांचे प्रात्यक्षिक योगगुरु प्रा.बीटी राठोड यांनी सादर केले. योग प्रशिक्षकांनी योगाचे शास्त्रीय महत्त्व स्पष्ट करून नियमित योगाभ्यासामुळे होणारे शारीरिक व मानसिक लाभ उपस्थितांना सांगितले.

## खा. रामराव वडकुतेंकडून रेल्वे विकास कामांची पाहणी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २१ जून**

राज्यसभा खासदार रामराव वडकुते यांनी हिंगोली रेल्वे स्थानकाला भेट दिली. केंद्र सरकारच्या अत्यंत महत्त्वाकांक्षी अमृत भारत स्टेशन योजनेअंतर्गत हिंगोली रेल्वे स्थानकावर सुरू असलेल्या विविध विकासकामांची त्यांनी प्रत्यक्ष पाहणी केली आणि आढावा घेतला.

या पाहणी दौऱ्यादरम्यान खासदार रामराव वडकुते यांनी रेल्वे स्थानकावर सुरू असलेल्या बांधकामाची, प्रवाशांसाठीच्या सुविधांची आणि आधुनिकिकरणाच्या कामांची पाहणी केली. उपस्थित संबंधित रेल्वे अधिकारी आणि कंत्राटदारांशी चर्चा करताना त्यांनी कामाबाबत गुणवत्तेबाबत कोणतीही तडजोड न करण्याच्या सक्त सूचना दिल्या. तसेच रेल्वे स्थानकावरील स्वच्छतेचा मुद्दा त्यांनी प्रामुख्याने लावून धरला. प्रवाशांना रेल्वे स्थानकावर आल्यानंतर प्रसन्न वातावरण मिळावे, यासाठी रेल्वे प्रशासनाने आणि स्वच्छता कर्मचाऱ्यांनी स्थानक परिसर चकाचक व स्वच्छ ठेवण्याकडे विशेष लक्ष द्यावे, अशा सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. यावेळी विलास गोरे, रजनीश पुरोहीत, बाबाराव घुगे, पवन उपाध्ये, रामेश्वर गायकवाड आणि रेल्वेचे अधिकारी व संबंधित कंत्राटदार उपस्थित होते. हिंगोली तालुक्यातील बासंबा येथील राष्ट्रीय महामार्गावरील रस्ता कामाची खासदार रामराव वडकुते यांनी पाहणी केली. कामाच्या गुणवत्तेबाबत संबंधितांना कडक सुचना दिल्या तसेच सार्वजनिक हिताच्या कामात कुठलीही तडजोड खपवून घेतली जाणार नाही. तांत्रिक निकष पाळूनच दर्जेदार साहित्य वापरावे, असे त्यांनी संबंधितांना बजावले. रस्ता खोदल्यामुळे विद्यार्थी, ग्रामस्थ आणि वाहनधारकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. ही बाब लक्षात घेऊन खासदार वडकुते यांनी कंत्राटदाराला कामाचा वेग वाढवण्याचे आदेश दिले. तसेच, पावसाळ्यात या ठिकाणी पाणी साचणार नाही याची योग्य ती खबरदारी आतापासूनच घेण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना दिल्या.



**हिंगोली- येथील संत नामदेव पोलिस कवायत मैदानावर क्रिडा व शिक्षण विभाग आणि पतंजली योग समितीच्यावतीने आयोजित योग शिबीरात एका तरूणाने विविध योगासनाचे प्रात्यक्षिक करून दाखविले. या तरूणाला उपस्थितांनी प्रतिसाद देत कौतुक केले. छाया- विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### मान्सून गायब, बि-बियाणे, खते घरातच

वसमत- जून महिना संपत आला तरी समाधानकारक पाऊस न झाल्याने तालुक्यातील शेतकरी मोठ्या आर्थिक व मानसिक संकटात सापडले आहेत.खरीप हंगामाच्या तयारीसाठी शेतकऱ्यांनी लाखो रुपये खर्च करून बी-बियाणे, खते आणि औषधे खरेदी करून ठेवली आहेत, मात्र पावसाने पाठ फिरवल्याने पेरणीच खोळंबली आहे. यंदा चांगल्या पावसाच्या अपेक्षेने अनेक शेतकऱ्यांनी कर्ज काढून किंवा उसनवारी करून बियाणे व खते खरेदी केली. काहींनी शेताची मशागत, नांगरणी आणि पेरणीपूर्व कामेही पूर्ण केली आहेत. मात्र २० जून उलटूनही दमदार पाऊस न झाल्याने हे सर्व साहित्य घरातच पडून असून शेतकऱ्यांच्या चिंतेत भर पडली आहे. सोयाबीन, कापूस, तूर, मूग, उडीद यांसारख्या खरीप पिकांची पेरणी योग्य वेळेत न झाल्यास उत्पादनावर परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे आधीच वाढत्या उत्पादन खर्चामुळे अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांसमोर मान्सूनच्या उशिरामुळे आणखी मोठे संकट उभे राहिले आहे. ग्रामीण भागात सध्या सर्वत्र एकच चर्चा सुरू आहे. बी-बियाणे आणि खते खरेदी करून ठेवली, पण पाऊसच येत नसल्याने पेरणी कधी करायची? पावसाअभावी शेतकऱ्यांची आर्थिक गणिते कोलमडू लागली असून आता सर्वांचे लक्ष मान्सूनच्या आगमनाकडे लागले आहे. बियाणे घरात, खते गोदामात आणि शेतकरी आभाळाकडे डोळे लावून बसला आहे, अशी परिस्थिती सध्या तालुक्यात निर्माण झाली आहे. पावसाअभावी जिल्ह्यात अनेक गावांमध्ये पाण्याचे स्त्रोत आटले असून पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे.

## कारवाईच्या भितीने दोन पोते गुटखा शेत शिवारात फेकला



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २१ जून**

औंढा नागनाथ येथे अवैध गुटखा विक्रेत्यांनी तुकाराम मुंडे पॅटर्नचा चांगला धसका घेतला असून येथील शिक्षक कॉलनी भागातील कनकेश्वरी मंदिर रोड लगत अवैध गुटख्याची दोन पोते कोणीतरी अज्ञाताने फेकून देऊन फरार झाल्याचे १९ जून रोजी सायंकाळी साडेचार वाजेच्या सुमारास उघडकीस आले आहे.

यानंतर ही माहिती औंढा नागनाथ पोलिसांना देण्यात आली. यानंतर पोलीस निरीक्षक शामकुमार डोंगरे, पोलीस उपनिरीक्षक श्रीधर वाघमारे, जमादार संतोष पवार, एजाज पटेल यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन पाहणी केली. त्यामध्ये नजर गोवा नावाचा दोन पोते गुटखा आढळून आला .सदरील गुटखा औंढा नागनाथ पोलिसांनी जप्त करून पोलीस ठाणे येथे आणण्यात आला. त्याची मोजणी करून याप्रकरणी गून्हा दाखल करण्यात येणार असून हा गुटखा जो कोणी फेकून दिला. त्या फरार आरोपीचा शोध घेतल्या जात आहे. दरम्यान मुंडे पॅटर्नचा औंढा नागनाथ शहरासह तालुक्यात गुटखा माफीयांनी चांगलाच धसका घेतला आहे. त्यामुळे गुटखा माफीयांनी जमा केलेला अवैध गुटखा आता जागा दिसेल तिथे फेकून दिल्या जात आहे. दरम्यान फेकून दिलेल्या गुटखा माफियाचा शोध घेऊन त्यावर कडक कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलिस निरीक्षक डोंगरे यांनी सांगितले.

## जनतेच्या कामासाठी सत्तेत जाणे क्रमप्राप्त- खा. नागेश पाटील आष्टीकर



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २१ जून**

मी पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांच्यावर मुळीच नाराज नाही परंतु सत्तेशिवाय कार्यकर्त्यांची आणि जनतेची कामे होत नाहीत, ही वस्तुस्थिती आहे त्यामुळे त्यांची कामे करणे हे माझे कर्तव्य आहे. आपल्याला विकासासाठी कुठलाही निधी मिळत नव्हता. केवळ खासदारांना मिळणारा ५ कोटींचा निधी गावोगावच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी अतिशय अपुरा पडतो. प्रत्येक गावात गेल्यावर लोकांना विकासाची अपेखा असते जर निधीच नसेल तर मी लोकांची कामे कशी करू? असा सवाल करीत जनतेच्या कामांसाठी सत्तेत जाणे क्रमप्राप्त आहे अशी पहिला प्रतिक्रिया हिंगोली लोकसभा मतदारसंघाचे खा. नागेश पाटील आष्टीकर यांनी दिली आहे.

शिवसेना ठाकरे गटातील ६ खासदारांच्या बंडखोरीच्या नाट्यानंतर अखेर बंडखोर खा. नागेश पाटील आष्टीकर यांनी सोशल मिडीयावर व्हिडीओ प्रसारीत करून पहिली प्रतिक्रीया दिली आहे. या व्हीडीओमध्ये त्यांनी मी उध्दव ठाकरे यांच्यावर मुळीच नाराज नाही. उध्दव साहेबांनी मला खूप प्रेम दिले यात दुमत नाही. संजय राऊत किंवा मोठी मंडळी काही बोलत असतील तर तो त्यांचा हक्क आहे. त्यांनीही माझ्यावर खूप प्रेम केले आहे. त्यामुळे ते बोलतात. काही अडचणीचे नाही. ते माझ्या वडिलांप्रमाणे आहेत. त्यामुळे ते बोलले तर मला वाईट वाटणार नाही. १८ जूनपर्यंत कोणीही कुठेही गेले नव्हते मात्र पक्षाकडून ज्या पध्दतीने बोलण्याचा अतिरेक झाला त्यामुहे आता इथे थांबून काही फायदा नाही असा विचार बऱ्याच सहकाऱ्यांनी केला आणि हे पाऊल उचलले. मतदार संघाचा विकास आणि निधी आणण्यासाठीच मला सत्तेत जाणे क्रमप्राप्त होते. माझ्यावर जनतेने टाकलेली जबाबदारी मी पूर्ण निष्ठेने पार पाडेन अशी प्रतिक्रीया सोशल मिडीयाच्या माध्यमातून खा आष्टीकर यांनी दिली आहे.

## हिंगोलीकरांच्या आरोग्य व्यवस्थेला बळकट करणारा प्रकल्प- खा. रामराव वडकुते



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २१ जून**

नागरिकांना अत्याधुनिक आरोग्य सेवा तसेच तरुणांना वैद्यकीय शिक्षणाची उत्तम संधी मिळावी यासाठी मंजूर झालेल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या सुरू असलेल्या बांधकाम व इतर विकासकामांची खासदार रामराव वडकुते यांनी प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली. यावेळी त्यांनी कामाच्या दर्जाबाबत आणि सद्यस्थितीचा आढावा घेत संबंधित अधिकारी व कंत्राटदारांना आवश्यक त्या सूचना दिल्या.

जिल्ह्यातील आरोग्य व्यवस्था अधिक बळकट करण्यासाठी हे वैद्यकीय महाविद्यालय अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे. महाविद्यालयाच्या इमारतीचे बांधकाम, प्रयोगशाळा, विद्यार्थ्यांचे वसतिगृह आणि संलग्न रुग्णालयातील सोयी-सुविधांची कामे दर्जेदार आणि विहित मुदतीत पूर्ण व्हावीत, या दृष्टीने खासदार रामराव वडकुते यांनी सुरु असलेल्या विकास कामाची पाहणी केली. पाहणी दरम्यान खासदार वडकुते यांनी सांगितले की, हिंगोलीकरांसाठी हा अत्यंत महत्त्वाकांक्षी प्रकल्प असून, बांधकामाच्या दर्जात कोणत्याही प्रकारची तडजोड खपवून घेतली जाणार नाही. सर्व कामे वेळेत पूर्ण करून हे महाविद्यालय पूर्ण क्षमतेने जनतेच्या सेवेत दाखल व्हावे, यासाठी प्रशासन आणि कंत्राटदारांनी समन्वयाने काम करण्याच्या सुचना त्यांनी केल्या.

या प्रसंगी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.चक्रधर मुंगल,भाजपा जिल्हा प्रवक्ता विलास गोरे, शहराध्यक्ष रजनिश पुरोहीत, रामेश्वर गायकवाड यांच्यासह भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## टीईटी पात्रता संदर्भात महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे जिल्हाधिकाऱ्यांना विविध मागण्यांचे निवेदन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २१ जून**

दिनांक १९ जून २०२६ रोजी अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघ संलग्रित महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभाग हिंगोलीच्या वतीने शिक्षकांच्या टीईटी पात्रता परीक्षा संदर्भातील विविध मागण्याकडे केंद्र शासनाचे लक्ष वेधण्यासाठी दि १९ रोजी देशातील ६५० जिल्ह्यांमध्ये माननीय पंतप्रधान भारत सरकार यांना जिल्हाधिकारी कार्यालया मार्फत निवेदन देण्यात आले.

महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभाग हिंगोली च्या वतीने हिंगोली जिल्हाधिकारी कार्यालयात अप्पर जिल्हाधिकारी महेंद्र कांबळे, निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यू बोधवड यांना राज्य कार्याध्यक्ष रमेश क्षीरसागर, जिल्हाध्यक्ष जगन्नाथ सोनटक्के मराठवाडा कार्याध्यक्ष निळकंठ गायकवाड, जिल्हा कार्यवाह बालाजी चव्हाण, मराठवाडा उपाध्यक्ष कुंडलिक निर्मले यांच्या नेतृत्वात निवेदन देण्यात आले. निवेदनात दिनांक २३ ऑगस्ट २०१० पूर्वी नियुक्त सर्व शिक्षकांना टीईटीच्या अनिवार्य तेथून कायमस्वरूपी वगळण्यात यावी. अशा शिक्षकांच्या सेवा जेष्ठता पदोन्नती व इतर सर्व सेवा लाभांना संपूर्ण संरक्षण प्रदान करण्यात यावे. आवश्यकता भासल्यास संसदेमध्ये आवश्यक विधायी दुरुस्ती अथवा विशेष तरतूद करून या वर्गाला कायमस्वरूपी दिलासा देण्यात यावा. सर्व राज्य व केंद्रशासित प्रदेशांना स्पष्ट निर्देश जारी करून शिक्षकांमध्ये निर्माण झालेली संभ्रम व असुरक्षिततेची परिस्थिती तातडीने दूर करण्यात यावी.

याप्रसंगी वसमत अध्यक्ष आशिष सालमोठे औंढा तालुका अध्यक्ष विलास लांडगे, हिंगोली तालुका अध्यक्ष अनिल पोपळाईतकर गोविंद कमले जिल्हा कार्यवाहक भीमाशंकर रावले, रामजी यशवंते शिवाजीराव यशवंते,श्री कल्याण आहेर, संदीप लुटे, अनिल राठोड, गणेश वाघमोडे, चंद्रकांत घ्यार व जेष्ठ कार्यकर्ते कुंडलिक निर्मले, आदेश देशपांडे उपस्थित होते.

CMYK

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## ११ वी प्रवेश प्रक्रिया आजपासून सुरू होणार

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २१ जून : शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेअंतर्गत शिक्षण विभागाने एक महत्वपूर्ण निर्णय घेतला आहे.

११ वी ते ११ वी आणि ११ वी ते १२ विद्यार्थी बदल प्रक्रियेसाठीची स्टुडंट ट्रान्सफर मॉड्युल ऑनलाईन संगणकीय प्रणाली आज सोमवार दि. २२ जूनपासून सुरु करण्यात येत आहे.

या संदर्भातील अधिकृत परिपत्रक शिक्षण विभागाकडून जारी करण्यात आले आले. विभागीय शिक्षण उपसंचालक, जिल्ह्यांचे माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी आणि शिक्षण निरीक्षकांना या नवीन प्रणालीबाबत आवश्यक बदल आणि पूर्वतयारी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.



## विविध वृत्त...

### मंगेशकर महाविद्यालयात 'आंतरराष्ट्रीय योग दिन' उत्साहात साजरा



तभा वृत्तसेवा

निलंगा दि. २१ जून :- तालुक्यातील औराद शहाजानी येथील मास्टर दीनानाथ मंगेशकर महाविद्यालयात राष्ट्रीय छात्र सेना विभागाच्या वतीने 'आंतरराष्ट्रीय योग दिन' उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.शंकर कल्याणे होते. यावेळी योगप्रशिक्षक म्हणून महाविद्यालयातील समाजशास्त्र विभागाचे डॉ.आनंद मुसळे यांनी योगाची विविध प्रात्यक्षिके सादर करून निरोगी आरोग्यासाठी नियमित योगा व प्राणायाम, संतुलित व पौष्टिक आहार इत्यादी आवश्यक असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तथा प्रास्ताविक राष्ट्रीय छात्र सेना विभागाचे डॉ.भगवान कदम यांनी केले. अध्यक्षीय समारोप प्र.प्राचार्य डॉ.शंकर कल्याणे यांनी केले. याप्रसंगी पर्यवेक्षक प्रा.प्रमोद मरगणे, क्रीडा विभागप्रमुख प्रा.विजयकुमार हंडे, प्रा.अंजना मुळे, डॉ.सचिन हंचाटे, डॉ.विजयकुमार पवार, डॉ.विनोद जाधव, डॉ.विनोद चिंते, डॉ.सुचिता किडीले, डॉ.रितेश व्यास, डॉ.राजू हंबीर, प्रा.आशिष खडकेश्र्वर, प्रा.श्रीकांत ढेबे, प्रा.रवींद्र अंबुलगे, विलासराव होटकर, व्यंकटराव शिवणे, राजेंद्र बेलुरे, मारोती पवार, विजयकुमार बाबछडे यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व राष्ट्रीय छात्र सेना विभागाचे कॅडेट्स उपस्थित होते.

## लातूर जिल्हा माहेश्वरी सभेच्या वतीने लातुरात विविध उपक्रमांनी साजरी होणार महेश नवमी

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २१ जून : लातूर जिल्हा माहेश्र्वरी सभेच्या वतीने प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीही दि. २३ व २४ जून २०२६ रोजी विविध उपक्रमांनी महेश नवमी साजरी करण्यात येणार आहे.

महेश नवमीचे औचित्य साधून लातूर शहरातील छत्रपती शिवाजी मार्केट यार्डातील गौरीशंकर मंदिरापासून भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे. शोभायात्रेदरम्यान माहेश्र्वरी ढोल ताशा पथक विशेष आकर्षण राहणार आहे. शोभा यात्रेचे संयोजक ईश्र्वर बाहेती, संतोष तोष्णीवाल, गणेश हेड्डा, नंदकिशोर लोया, राहुल लोया, ईश्र्वर चांडक, दिनेश गिल्डा हे आहेत. यावर्षीच्या महेश नवमी उत्सवाच्या स्नेहभोजनाचे यजमान तोष्णीवाल हे असून स्नेहभोजनाचा कार्यक्रम मंगळवार दि. २३ जून रोजी सायंकाळी ७ ते १० या वेळेत गोदावरीदेवी लाहोटी कन्या प्रशाला येथे होईल. याच ठिकाणी रक्तदान शिबिराचेही आयोजन करण्यात आले आहे.

दि. २४ जून रोजी दुपारी चार वाजता दयानंद सभागृहात माहेश्र्वरी समाजासाठी आपला अमूल्य वेळ, श्रम एवं यथाशक्ती आर्थिक सहयोग देणाऱ्या मान्यवरांना महेश भूषण, महेश गौरव, महेश सेवा पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. या सोहळ्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य केमिस्ट अँड ड्रगिस्ट असो.चे सचिव अनिलकुमार नावंदर यांचे मार्गदर्शन होणार आहे. नावंदर हे विसरत चाललेले संस्कार आणि पारिवारिक संबंध दृढ करण्याकामी



प्रेरणादायी - प्रखर वक्ते म्हणून परिचित आहेत. लातूर जिल्हा महिला माहेश्र्वरी संगठनच्या वतीने शिवस्य नवारसामृतम ही भव्य दिव्य नृत्य नाटिका सादर केली जाणार आहे. यावेळी माहेश्र्वरी समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान केला जाणार आहे. या कार्यक्रमाचे संयोजक आनंद चरखा, सुरभी कचोलिया, अनिकेत चांडक हे आहेत. या सोहळ्याप्रसंगी लातूर जिल्हा माहेश्र्वरी सभेचे अध्यक्ष सीए प्रकाश कासट , सचिव राजेशकुमार मंत्री, अ . भा. महासभा सदस्य हुकूमचंद कलंत्री, फुलचंद काबरा, बालकिशन मुंदडा, माहेश्र्वरी सभेचे कोषाध्यक्ष जगदीश भुतडा, महाराष्ट्र प्रदेश माहेश्र्वरी महिला संगठनच्या प्रदेश सचिव सौ.अनिता मालू, लातूर जिल्हा महिला संगठनच्या अध्यक्षा सौ. ललिता राठी, महाराष्ट्र प्रदेश युवा माहेश्र्वरी संगठन चे संगठन मंत्री तथा सहकार मंत्री राम भुतडा, लातूर जिल्हा युवा माहेश्र्वरी सांगाथांचे अध्यक्ष अभिषेक मुंदडा, लातूर शहर माहेश्र्वरी सभेचे अध्यक्ष लक्ष्मीकांत सोनी, युवा माहेश्र्वरीचे अध्यक्ष निकुंज भुतडा,माहेश्र्वरी किशोरी मंडलच्या प्रांजल डागा, संयोजक संतोष तोष्णीवाल, गणेश हेड्डा, ईश्र्वर बाहेती, राहुल लोया, एड. नंदकिशोर लोया, संतोष तोष्णीवाल यांची मंचावर उपस्थिती राहणार आहे.

लातूर जिल्हा माहेश्र्वरी सभेच्या वतीने श्री महेश नवमी निमित्त आयोजित करण्यात आलेल्या या सर्व उपक्रमात समाज बांधवांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवावा,असे आवाहन लातूर जिल्हा माहेश्र्वरी महासभेचे अध्यक्ष सीए प्रकाश कासट , सचिव राजेशकुमार मंत्री, कोषाध्यक्ष जगदीश भुतडा, संगठन मंत्री फुलचंद काबरा, उपाध्यक्ष शामसुंदर मानधना , विष्णुदास मंत्री, चांदकरण लड्डा, रामेश्र्वर पुनपाळे, अशोक बाहेती, ओमप्रकाश सारडा, रामेश्र्वर भराडिया, गोकुळदास चांडक, दिलीप सोमाणी, नंदकिशोर करवा , राजगोपाल बांगड, संजय जाजू, नंदकिशोर लोया, राजकुमार सोनी, प्रल्हाद चांडक,अशोक जाजू,संतोष तोष्णीवाल, ईश्र्वर चांडक, राहुल लोया, राम भुतडा, जयराम भुतडा, सत्यनारायण हेड्डा, राजगोपाल बाहेती, संतोष मुंदडा,गोपाल काबरा यासह समाजातील मान्यवरांनी केले आहे.

## जिल्हाधिकारी बास्टेवाड यांच्या वाढदिवसानिमित्त पर्यावरण संरक्षणाचा संदेश

### एक व्यक्ती - पाच झाडे संकल्पाचा प्रचार



लातूर दि. २१ जून : वाढदिवस हा केवळ उत्सवाचा नव्हे तर समाजहिताचा संदेश देण्याचाही प्रसंग ठरू शकतो, याचा आदर्श लातूर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांच्या वाढदिवसानिमित्त पाहायला मिळाला. त्यांच्या वाढदिवसानिमित्त पर्यावरण संवर्धन, प्लास्टिकमुक्त लातूर आणि कापडी पिशवी वापर जनजागृती अभियान उत्साहात राबविण्यात आले. यावेळी पर्यावरण रक्षणासोबतच नागरिकांच्या आरोग्यपूर्ण आणि जबाबदार जीवनशैलीवरही भर देण्यात आला.

कार्यक्रमात वाढदिवस, लग्नसमारंभ तसेच विविध आनंदाच्या प्रसंगी फटाके, हार-तुरे आणि अनावश्यक खर्च टाळून वृक्षारोपण करण्याचा संदेश देण्यात आला. पर्यावरण संतुलन राखण्यासाठी प्रत्येकाने आपल्या दैनंदिन जीवनात छोटे पण प्रभावी बदल स्वीकारण्याची गरज व्यक्त करण्यात आली. तसेच, प्लास्टिक पिशव्यांचा वापर पूर्णतः बंद करून कापडी पिशवीचा स्वीकार करण्याचे आवाहन करण्यात आले.

विशेष म्हणजे सामाजिक कार्यकर्ते संजय राजुळे यांच्या आपले आरोग्य, आपलीच जबाबदारी या अभियानांतर्गत राबविण्यात येत असलेल्या मोफत कापडी पिशवी वाटप उपक्रमाचे उपस्थित मान्यवरांनी विशेष कौतुक केले. पर्यावरण संरक्षणासोबतच नागरिकांमध्ये आरोग्य, स्वच्छता आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करण्यासाठी हा उपक्रम प्रभावी ठरत असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.बाजारात जाताना प्रत्येक नागरिकाने स्वतःसोबत कापडी पिशवी नेण्याचा संकल्प करावा, प्लास्टिकमुक्त लातूर उभारण्यासाठी सामूहिक सहभाग वाढवावा आणि पर्यावरण संवर्धनाला लोकचळवळीचे स्वरूप द्यावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

एक व्यक्ती - पाच झाडे, प्लास्टिकला नकार - कापडी पिशवीचा स्वीकार आणि पर्यावरण संरक्षण - प्रत्येकाची जबाबदारी हा संदेश देत जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांच्या वाढदिवसानिमित्त पर्यावरण रक्षणाचा संकल्प करण्याचे आवाहन करण्यात आले.

## फसवणूक प्रकरणात १७ वर्षांपासून फरार आरोपीला पुण्यातून अटक

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २१ जून : तब्बल १७ वर्षांपासून न्यायालय व पोलीस प्रशासनाला गुंगारा देत फरार असलेल्या फसवणूक प्रकरणातील आरोपीस लातूर पोलिसांच्या विशेष पथकाने पुणे येथून शिताफीने ताब्यात घेऊन न्यायालयासमोर हजर केले आहे.



पोलीस स्टेशन लातूर ग्रामीण येथे २००९ मध्ये दाखल झालेल्या गुन्हा क्रमांक १४५/२००९ कलम ४२० भावि मधील आरोपी गोविंद व्यंकटराव डांगे (वय ५३ रा. हासोरी बु., ता. निलंगा) हा गेल्या १७ वर्षांपासून फरार होता. न्यायालयाने त्याच्याविरुद्ध अटक वॉरंट तसेच जाहीरनामाही काढला होता; मात्र आरोपी सातत्याने आपले वास्तव्य बदलत असल्याने तो पोलीसांच्या हाती लागत नव्हता. या प्रकरणातील फिर्यादीने शेतीसाठी ट्रॅक्टर खरेदी करण्याच्या उद्देशाने आरोपी गोविंद डांगे याच्याकडे दि. ४ फेब्रुवारी २००९ रोजी एक लाख रुपये जमा केले होते. त्या बदल्यात आरोपीने एका महिन्यात ट्रॅक्टर उपलब्ध करून देण्याचे आश्र्वासन दिले होते. मात्र मुदत उलटल्यानंतरही ट्रॅक्टर न देता अथवा घेतलेली रक्कम परत न करता आरोपीने फिर्यादीची फसवणूक केली. एवढेच नव्हे तर आणखीन एका कडून मोटारसायकल देण्याचे आमिष दाखवून ५५ हजार रुपये स्वीकारले आणि त्यांनाही वाहन अथवा पैसे परत न देता फसविले. अशा प्रकारे अनेक नागरिकांची आर्थिक फसवणूक झाल्याच्या तक्रारी समोर आल्या होत्या.

दरम्यान फरार आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांचे निर्देशावर, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांचे मार्गदर्शनात विशेष पथकाने या आरोपीचा शोध सुरू ठेवला होता.

या तपासादरम्यान आरोपी गोविंद डांगे हा पुणे परिसरात वास्तव्यास असल्याची गोपनीय माहिती पोलीस अंमलदार दत्तात्रय शिंदे यांना प्राप्त झाली. माहितीची खातरजमा करून वरिष्ठांच्या आदेशानुसार पथकाने पुणे येथील लोणी काळभोर परिसरातील हडपसर टोलनाका भागात सापळा रचून आरोपीस ताब्यात घेऊन दि. १८ जून रोजी रात्री लातूर ग्रामीण पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले. आरोपीस न्यायालयासमोर हजर केले असता मुख्य न्यायदंडाधिकारी सतीश पाटील यांनी त्यास न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या पथकातील पोलीस उपनिरीक्षक संजय भोसले, पोलीस अंमलदार दत्तात्रय शिंदे, संतोष खांडेकर यांनी पार पाडली.

## प्राचार्य डॉ. कुंभार यांना जीवनगौरव पुरस्कार जाहीर

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २१ जून : येथील महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाचे सेवानिवृत्त प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील विद्यार्थी प्रिय ग्रंथपाल आदरणीय स्नेहलता मारुतीराव पाटील यांच्या नावाने दिला जाणारा पहिला स्नेहलता पाटील जीवनगौरव पुरस्कार जाहीर झाला आहे.

प्रा. समाधान दहिवाळ, मुख्य संयोजक, छत्रपती संभाजीनगर येथील पुरोगामी सामाजिक, सांस्कृतिक फाउंडेशनचे मुख्य संयोजक प्रा. समाधान दहिवाळ यांनी हा पुरस्कार जाहीर केला. दि. २८ जून रोजी सकाळी १० वाजता या पुरस्काराचे वितरण महसूल प्रबोधनी, छत्रपती संभाजीनगर येथील दुसऱ्या स्त्रीवादी साहित्य संमेलनामध्ये होणार आहे. या पुरस्काराबद्दल त्यांचे सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन केले जात आहे.

## सुप्रभात ग्रुपच्या वतीने जागतिक योग दिवस साजरा



तभा वृत्तसेवा

लातूर दि. २१ जून : येथील सुप्रभात ग्रुप, ग्लोबल फाउंडेशनच्या वतीने जागतिक योग दिवस उत्साहात साजरा करण्यात आला.

या प्रसंगी महापौर जयश्रीताई सोनकांबळे, योग मार्गदर्शक वाघमारे गुरुजी, ग्रुपचे अध्यक्ष राजकुमार मस्के, शिवशंकर सुरवसे, मोहन रासुरे , दत्तात्रय स्वामी बसपुरे, प्रभाकर साबळे, बाबा गायकवाड, काशिनाथ वंजारे, द्वारकादास बिदादा, भीमराव बोयणे, ग्लोबल फाऊंडेशनचे अध्यक्ष नवनाथ गडदे, कवितके करबसप्पा पोपडे, डॉ. शिवपुजे, सौ. सरोजनी पोपडे, सौ. संगीता कवितके, गंगाधर ढोणे, व्यंकटराव सूर्यवंशी, धनराज माने, शुभम देवकते आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

योग दिनाचा हा कार्यक्रम हुतात्मा स्मारक या ठिकाणी पार पडला. यावेळी उपस्थितांना पक्षांसाठी पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी येळण्यांचे वाटप महापौर जयश्रीताई सोनकांबळे यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिवशंकर सुरवसे यांनी केले तर आभार दत्ता स्वामी यांनी मानले

## महागरपालिकेच्या स्वच्छता विभागाची कारवाई

### सिंगल युज प्लास्टिक वापरणाऱ्या आस्थापनांकडून २२ हजारांचा दंड वसूल



तभा वृत्तसेवा

लातूर दि. २१ जून :महापौर जयश्रीताई सोनकांबळे, आयुक्त श्रीमती मानसी यांचे निर्दे शानुसार दि. २० जून रोजी शहरातील गंजगोलाई भागात सिंगल युज प्लास्टीकवर व सार्वजनिक रस्त्यावर कचरा टाकणाऱ्यावर कार्यवाही करण्यात येऊन २० हजार ५०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.

सदर कार्यवाहीदरम्यान सिंगल युज प्लास्टिक वापर करणाया ४ आस्थापनांवर दंडात्मक कार्यवाही करून २० हजार रूपयेची दंडात्मक कार्यवाही करण्यात आली. तसेच सार्वजनीक ठिकाणी कचरा टाकणाऱ्या एका नागरिकाला ५०० रुपये दंड करण्यात आला. सदर कार्यवाहीदरम्यान प्रमुख स्वच्छता निरीक्षक अक्रम शेख, शिवराज शिंदे, स्वच्छता निरीक्षक महादेव फिस्के, प्रदीप गायकवाड, रवि शेंडगे, श्रीकांत शिंदे, तसेच कर्मचारी उपस्थित होते.

## ११ वर्षापासून फरार २ आरोपींना अखेर बेड्या

### भादा पोलिस ठाण्याकडून विशेष मोहिमेंतर्गत कारवाई

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २१ जून : वर्षानुवर्षे फरार राहून कायद्याला चकवा देणाऱ्या आरोपींना न्यायालयासमोर उभे करण्याच्या उद्देशाने जिल्हा पोलीस दलाकडून विशेष मोहीम राबविण्यात येत आ-हे. पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये प्रलंबित असलेल्या गंभीर गुन्ह्यांचा तसेच फरार आरोपींच्या अभिलेखांचा सखोल आढावा घेत संबंधित अधिकारी व अंमलदारांना अशा आरोपींचा शोध घेऊन त्यांना तातडीने अटक करण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या होत्या. त्या अनुषंगाने अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली स रू असलेल्या विशेष शोध मोहिमेत आणखी एक उल्लेखनीय यश पोलीसांना मिळाले आहे. पोलीस ठाणे भादा येथे २०१५ मध्ये दाखल असलेल्या चोरीच्या गुन्ह्यातील तब्बल ११ वर्षांपासून फरार असलेल्या दोन आरोपींना अटक करण्यात पोलीसांना यश आले आहे.



दि. ५ ऑगस्ट २०१५ ते ६ ऑगस्ट २०१५ च्या मध्यरात्री दरम्यान प्राथमिक आरोग्य केंद्र, बेलकुंड येथील परिसरातील चंदनाच्या झाडाचा गाभा अज्ञात व्यक्तींनी चोरी करून नेला होता. चोरीस गेलेल्या चंदनाची किंमत सुमारे ५ हजार रुपये होती. याप्रकरणी प्राथमिक आरोग्य केंद्र, बेलकुंड येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. किरण पळंगे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून दि. ६ ऑगस्ट २०१५ रोजी पोलीस ठाणे भादा येथे गुरनं. ६६/२०१५, कलम ३७९ भादंवि तसेच भारतीय वन अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्ह्याच्या तपासादरम्यान यापूर्वी तीन आरोपींना अटक करण्यात आली होती. मात्र नितीन गोरख राऊत (वय ४८ वर्षे, रा. सर्जापूर, ता. बार्शी, जि. सोलापूर) व रामचंद्र उर्फ राम धर्मराज माळी (वय ५० वर्षे, रा. नारी, ता. बार्शी, जि. सोलापूर) हे दोन्ही आरोपी गुन्हा दाखल झाल्यापासून फरार होते.

विशेष मोहिमेदरम्यान पोलीसांनी तांत्रिक माहिती, गोपनीय बातमीदारांचे जाळे तसेच विविध ठिकाणी पडताळणी करून या दोन्ही आरोपींचा माग काढला. अखेर त्यांना शोधून ताब्यात घेण्यात आले. आरोपींविरुद्ध आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून पुरवणी दोषारोपपत्रासह त्यांना मा. न्यायालयासमोर हजर करण्यात आले आहे.

सदरची कारवाई पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक डॉ. विशाल शहाणे, पोहेकॉ फिरोज शेख, कांबळे, पोना/पाटील, पोअं/मोरे यांनी केली आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## भागीरथी शाळेत 2003 च्या बॅचचे स्नेहसंमेलन उत्साहात



तभा वृत्तसेवा

**पैठण दि २१ :-** २००३. मध्ये दहावी उत्तीर्ण झालेले विद्यार्थी तब्बल २३ वर्षांनंतर एकत्र आले. शनिवारी पैठण तालुक्यातील भागीरथी स्त्री शिक्षण विद्यामंदिर वडवाळी वाघाडी येथेस्नेहमीलन कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्र संचलन ज्ञानेश्वर गंगाधर, सीमा जाधव यांनी केले. यावेळी मंदा राऊत, शोभा पोकळे, सूर्यकला वाघमोडे, योगिता सव्वासे, अर्चना धुमाळ, शिवाजी जमधडे, सोमनाथ शिंदे, राजू कर्डीले, अनिल पोकळे, सुनील पोकळे, एकनाथ शिपणकर, प्रल्हाद घटे, रवींद्र आमले, राम पाचे, अशोक सानप, दादासाहेब पाचे, गणेश गिरगे, अमोल मोटकर, संतोष मगरे, पांडुरंग मैंदड, दत्ता घोंगडे, राम खोपडे, सोमनाथ आहेर आदी उपस्थित होते.

मुख्याध्यापिका जलकन्या गोरे यांच्या उपस्थितीत सहशिक्षक बबन ढवळे, संजय गिरी, आबासाहेब जाधव, संदीप हंबरडे, राजेश वाघस्कर, संदीप पोटे, राजकुमार पवार, संजय शिंदे, काशिनाथ मुटकुळे मामा यांच्या हस्ते उपस्थित विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर प्रत्येकाने आपला परिचय देत गेल्या २३ वर्षातील सुख दुःखाचा उलगडला. कोणी शेती तर कोणी उद्योजक तर कोणी सरकारी सेवेत कार्यरत असल्याचे पाहून सर्वांनी एकमेकांचे अभिनंदन केले.

कार्यक्रमात शाळेतील जुन्या आठवणींना उजाळा देण्यात आला. वर्गातील धमाल, शिक्षकांचा धाक, सहलीच्या गमतीजमती सांगताना अनेक

## देवगिरी बँकेत आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा



**छत्रपती संभाजीनगर :** आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त देवगिरी बँकेच्या वतीने “करो योग, रहो निरोग” या संदेशाखाली विशेष योग कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात योग, संतुलित आहार आणि निरोगी जीवनशैलीबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमास बिहार राज्यातील पश्चिम चंपारण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. संजीव जैस्वाल आणि डॉ. सौ. मंजु चौधरी यांची प्रमुख उपस्थिती लाभली. प्रमुख पाहुणे म्हणून चारुदत्त देशपांडे उपस्थित होते. यावेळी देवगिरी बँकेचे अध्यक्ष किशोर शितोळे, नगरसेवक रामेश्वर भादवे, विजय जैस्वाल, मुकुंद लाडकीकर, संचालक सुरेश जगाडे, संचालिका क्षमाताई खोब्रागडे, संचालिका प्रज्ञाताई तल्हार, संचालिका अमिताताई लेकुरवाळे तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण नांदेडकर यांच्यासह बँकेचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान उपस्थितांनी आरोग्य, संतुलित आहार आणि निरोगी जीवनशैलीशी संबंधित विविध प्रश्न विचारले. त्यावर खासदार डॉ. संजीव जैस्वाल आणि डॉ. सौ. मंजु चौधरी यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. योगाचा शारीरिक व मानसिक आरोग्यावर होणारा सकारात्मक परिणाम, तणावमुक्त जीवनासाठी योगाचे महत्त्व आणि नियमित योगाभ्यासाचे फायदे याविषयी त्यांनी उपस्थितांना माहिती दिली. यावेळी अध्यक्ष किशोर शितोळे यांनी योग हा निरोगी आणि संतुलित जीवनाचा मूलमंत्र असल्याचे सांगत प्रत्येकाने दैनंदिन जीवनात योगाचा समावेश करून आरोग्य संवर्धनासाठी प्रयत्न करावेत असे आवाहन केले.

## फर्दापूर येथे मोहरम निमित्त रुट मार्च



तभा वृत्तसेवा

फर्दापूर दि 20फर्दापूर येथे मोहरम निमित्ताने गावात रुट मार्च करण्यात आले. फर्दापूर . फर्दापूर पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या मोहरम सणा निमित्ताने उपविभागीय पोलिस अधिकारी एस पी कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली फर्दापूर पोलिस स्टेशन चे सहा पोलीस निरीक्षक सुधीर मोटे तसेच पोलिस कर्मचारी होमगार्ड यांच्या फर्दापूर गावात रुट मार्च करण्यात आला.

## केंद्रीय मंत्री मनसुख मांडविया यांनी भारत बिल्डकॉन 2026 ला भेट दिली

**नवी दिल्ली, २० जून, २०२६:** बांधकाम साहित्य, बांधकाम आणि पायाभूत सुविधा क्षेत्रांसाठीच्या भारतातील प्रमुख प्रदर्शन, भारत बिल्डकॉन २०२६ च्या तिसऱ्या दिवशी, भारत सरकारचे कामगार आणि रोजगार तसेच युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्री, श्री मनसुख मांडविया यांनी प्रदर्शनाला भेट दिली. नवी दिल्लीतील यशोभूमी कन्व्हेन्शन सेंटरमध्ये आयोजित या प्रदर्शनात त्यांनी प्रदर्शक, प्रमुख उद्योग प्रतिनिधी, उत्पादक आणि आंतरराष्ट्रीय खरेदीदार यांची भेट घेतली आणि भारतीय कंपन्यांनी सादर केलेले नवीनतम नवोपक्रम आणि क्षमतांचे निरीक्षण केले.कार्यक्रमाची भव्यता आणि मिळालेल्या प्रचंड प्रतिसादाने प्रभावित होऊन, श्री मनसुख मांडविया म्हणाले की, भारत बिल्डकॉन हे उद्योगासाठी एक अत्यंत यशस्वी आणि प्रभावशाली व्यासपीठ म्हणून उदयास आले आहे.

### 10 दशलक्षाहून अधिक लोक योग सप्ताहात सामील

**मुंबई :** आंतरराष्ट्रीय योग दिन २०२६ च्या निमित्ताने, भारताच्या सवयी लावणाऱ्या वेलनेस प्लॅटफॉर्म, हॅबिल्डने आपला १० वा जागतिक विक्रम प्रस्थापित केला आहे. केवळ एका आठवड्यात १० दशलक्षाहून अधिक लोक त्यांच्या योग चळवळीत सामील झाले, ज्यामुळे ही जगातील सर्वात मोठ्या सामुदायिक वेलनेस मोहिमांपैकी एक ठरली आहे. या चळवळीत अभूतपूर्व सहभाग दिसून आला, ज्यात एकाच दिवसात २० लाखांहून अधिक लोक सामील झाले. हा बदल प्रतिबंधात्मक आरोग्य आणि शाश्वत सवयी निर्माण करण्याच्या वाढत्या प्रवृत्तीचे प्रतिबिंब आहे. या उपक्रमाला सातत्याने गती मिळत आहे, कारण भारत आणि जगभरातील सहभागी या आठवडाभर चालणाऱ्या जागतिक विक्रमाच्या प्रयत्नात सामील होत आहेत, ज्याची सांगता आंतरराष्ट्रीय योग दिनी होईल.

# बिडकीनच्या पाच तरुणांचे मृतदेह हाती; गावात आक्रोश

## पोलीस प्रशासनाकडून रात्री उशिरा मृतदेह बिडकीनकडे रवाना

तभा वृत्तसेवा

**बिडकीन दि. २१ जून :** रत्नागिरी जिल्ह्यातील प्रसिद्ध पर्यटनस्थळ गणपतीपुळे समुद्रकिनाऱ्यावर पर्यटनासाठी गेलेल्या बिडकीन येथील पाच तरुणांचे मृतदेह शोधण्यात प्रशासनाला यश आले आहे. रत्नागिरीचे जिल्हा पोलीस अधीक्षक नितीन बगाटे आणि बिडकीन येथील सहायक पोलीस निरीक्षक निलेश शेळके यांनी दिलेल्या माहितीनुसार, अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत राबविण्यात आलेल्या शोधमोहिमेदरम्यान पाचही तरुणांचे मृतदेह समुद्रातून बाहेर काढण्यात आले. या भीषण दुर्घटनेमुळे संपूर्ण छत्रपती संभाजीनगर जिल्हा आणि विशेषतः बिडकीन परिसरावर





शोककळा पसरली आहे. शनिवारी सकाळी बिडकीन येथून १९ जणांचा एक गट पर्यटनासाठी गणपतीपुळे येथे गेला होता. सकाळी सुमारे १० वाजण्याच्या सुमारास समुद्रकिनाऱ्यावर फिरत असताना काही तरुण पाण्यात उतरले. मात्र समुद्रातील तीव्र लाटा आणि पाण्याचा वेगवान अंतर्गत प्रवाह यांचा अंदाज न आल्याने पाच जण खोल पाण्यात ओढले गेले. घटनेची माहिती मिळताच पोलीस, स्थानिक जीवरक्षक आणि प्रशासनाने युद्धपातळीवर शोधमोहीम सुरू केली.

शोधमोहिमेदरम्यान प्रेम आदमाने, अनिकेत हिवराळे, यश कांबळे, आनंद नरवडे आणि आदित्य राऊत या पाच तरुणांचे मृतदेह हाती लागले. समुद्रातील पाण्याचा प्रचंड वेग आणि प्रतिकूल परिस्थिती असूनही सर्व यंत्रणांनी समन्वयाने शोधकार्य राबविले. जिल्हा पोलीस अधीक्षक नितीन बगाटे यांनी सांगितले की, सापडलेल्या पाचही मृतदेहांवर आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून ते रात्री उशिरा छत्रपती संभाजीनगरकडे रवाना करण्यात आले आहेत. गणपतीपुळे येथे उपस्थित सामाजिक कार्यकर्ते आणि बिडकीन ग्रामस्थांच्या माहितीनुसार, मृतदेह रात्री उशिरापर्यंत गावात पोहोचण्याची शक्यता आहे. पर्यटनाचा आनंद लुटण्यासाठी गेलेल्या या तरुणांचा असा दुर्दैवी आणि करुण अंत झाल्याने त्यांच्या कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. संपूर्ण बिडकीन गाव शोकसागरात बुडाले असून सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. मृत तरुणांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी परिसरात शोकमय वातावरण निर्माण झाले आहे.

## संत ज्ञानेश्वर महाविद्यालयात योग दिन उत्साहात साजरा

तभा.वृत्तसेवा

**सोयगाव,दि.२१ जून :** संत ज्ञानेश्वर महाविद्यालय सोयगाव येथे आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. राष्ट्रीय सेवा योजना विभाग व क्रीडा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला.





कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिरीष पवार हे उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी योगामुळे शारीरिक आरोग्य सुदृढ राहण्याबरोबरच मानसिक शांतता, सकारात्मकता आणि एकाग्रता वाढण्यास मदत होते, असे सांगितले. नियमित योगाभ्यास हा निरोगी व संतुलित जीवनशैलीचा आधार असल्याचेही त्यांनी प्रतिपादन केले.योग प्रशिक्षक डॉ. निलेश गाडेकर आणि प्रा. विनोद चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना विविध योगासने, सूर्यनमस्कार, प्राणायाम तसेच ध्यानधारणेचे प्रात्यक्षिक करून घेतले. विद्यार्थ्यांनीही उत्स्फूर्त प्रतिसाद देत योगाभ्यासात सहभाग घेतला.

या प्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. रावसाहेब बारोटे, कार्यालयीन अधीक्षक पंकज साबळे यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. नियमित योगाभ्यास करून निरोगी जीवनशैली अंगीकारण्याचा संदेश यावेळी देण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. सुनील चौधरे यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. निलेश गावडे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. सुनील चौधरे, डॉ. निलेश गावडे, डॉ. पंकज गावित तसेच क्रीडा विभागाचे विभागप्रमुख डॉ. निलेश गाडेकर व गजानन शिरसागर यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनीही मोलाचे सहकार्य केले.

## जिल्हा परिषदेत उत्साहात आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा

### योग शिबिरासह वृक्षारोपण; निरोगी जीवनशैलीचा संदेश

तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर येथे रविवारी सकाळी योग शिबिराचे आयोजन करण्यात आले. मुख्य कार्यकारी अधिकारी मित्रू पी. एम. यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या उपक्रमात अधिकारी, कर्मचारी, लोकप्रतिनिधी आणि विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. योग दिनानिमित्त मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचाही संदेश देण्यात आला.



जिल्हा परिषदेच्या जिल्हा आयुष कक्ष, आरोग्य विभाग, शिक्षण विभाग, सामान्य प्रशासन विभाग आणि भारतीय योग संस्थान यांच्या संयुक्त विद्यमाने सकाळी ६.३० ते ७.३० या वेळेत योग सत्र पार पडले. या वेळी "निरोगी शरीरात निरोगी मन, निरोगी वृद्धत्वासाठी योग" हा संदेश देण्यात आला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील योग प्रशिक्षक डॉ. विजय काथार, कविता पिसोळकर, अर्चना पटेल, श्रद्धा पाठक, सुनीता कावळे, महालक्ष्मी गौडा आणि हरिभाऊ पवार यांनी ताडासन, वृक्षासन, भुजंगासन, प्राणायाम तसेच ध्यानधारणा यांचे प्रात्यक्षिक सादर करून त्यांचे महत्त्व विशद केले. चाटे हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सामूहिक योगासनांनी उपस्थितांची विशेष दाद मिळवली.

कार्यक्रमास जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष जितेंद्र जयस्वाल, समाजकल्याण सभापती बालाजी सोनटक्के, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके, पशुसंवर्धन विभागाचे उपायुक्त डॉ. नानासाहेब कदम, शिक्षणाधिकारी जयश्री चव्हाण, लेखाधिकारी संजय गादीकर, उपशिक्षणाधिकारी गीता तांदळे आणि सीमा मेहेत्रे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी उपाध्यक्ष जितेंद्र जयस्वाल यांनी योगाचे महत्त्व अधोरेखित करत योगाला जागतिक स्तरावर पोहोचविण्यात भारताच्या योगदानाचा उल्लेख केला. समाजकल्याण सभापती बालाजी सोनटक्के यांनी नियमित योगाभ्यासातून शारीरिक व मानसिक आरोग्य जपण्याचे आवाहन केले. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके यांनी योग व प्राणायाम हे आपल्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग असल्याचे सांगत नियमित सरावाचे महत्त्व विशद केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी उपमुख्य कार्यकारी अधिकारी राघवेंद्र घोरपडे, प्रभारी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. विशाल बेंद्रे, उपशिक्षणाधिकारी नीता श्रीमाळ यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले. क्रीडाशिक्षक कृष्णा शिंदे यांनी सूत्रसंचालन केले, तर जिल्हा आयुष अधिकारी डॉ. शकील शेख यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी गीता तांदळे, सुनिता वाघ, श्री वैद्य, श्री कुंभकरणे, श्री व्यास, श्री कुन्हा, राज जोशी आणि अमोल धोंडे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा; ग्रामीण पोलीस दलातील 200 हून अधिक अधिकारी-कर्मचाऱ्यांचा सहभाग

तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलीस दलाच्या वतीने रविवारी सकाळी गोकुळ मैदानावर विशेष योग शिबिराचे आयोजन करण्यात आले. "योग : कर्मसु कौशलम्" या संकल्पनेवर आधारित या उपक्रमात २०० हून अधिक पोलीस अधिकारी व अंमलदारांनी उत्साहाने सहभाग नोंदवत योगाभ्यासाचा संकल्प केला.

कार्यक्रमास छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्र यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव, अपर पोलीस अधीक्षक प्रशांत स्वामी तसेच ग्रामीण पोलीस दलातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



सकाळी ६ वाजता सुरू झालेल्या या योग शिबिरात वॉर्मअप, सूर्यनमस्कार, ताडासन, वृक्षासन, भुजंगासन यांसारख्या विविध योगासनांसह प्राणायामाचे प्रात्यक्षिक आणि सराव करण्यात आला. पोलीस दलातील तणावपूर्ण व धावपळीच्या जीवनशैलीत शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्य जपण्यासाठी योगाचे महत्त्व यावेळी अधोरेखित करण्यात आले.

यावेळी मार्गदर्शन करताना विशेष पोलीस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्र यांनी पोलीस दलातील अधिकारी-कर्मचाऱ्यांनी नियमित योगाभ्यास करणे आवश्यक असल्याचे सांगितले. योगामुळे शारीरिक लवचिकता वाढते, मानसिक शांतता लाभते आणि कार्यक्षमता सुधारते, असे त्यांनी नमूद केले. तसेच पतंजली योगसूत्रातील ‘योगश्चित्तवृत्ती निरोधः’ या सूत्राचा संदर्भ देत योगामुळे मानसिक तणावावर नियंत्रण मिळविण्यास मदत होत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव यांनीही योगाला केवळ व्यायाम न मानता जीवनशैलीचा अविभाज्य भाग बनविण्याचे आवाहन केले. महर्षी पतंजली यांनी प्रतिपादित केलेल्या अष्टांग योगाच्या तत्त्वांचा अंगीकार केल्यास तणावमुक्त आणि अधिक कार्यक्षम जीवन जगणे शक्य असल्याचे त्यांनी सांगितले.

या उपक्रमाच्या माध्यमातून ग्रामीण पोलीस दलाने अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करण्याबरोबरच ‘निरोगी पोलीस, सक्षम समाज’ हा संदेश दिला. योगशास्त्राच्या प्राचीन परंपरेचा गौरव करत निरोगी जीवनासाठी योगाचे महत्त्व पुन्हा अधोरेखित करण्यात आले.

## आर्य चाणक्य मध्ये योगदिन साजरा



तभा वृत्तसेवा

**पैठण दि २१ :-** भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंबाजोगाई द्वारा संचलित आर्य चाणक्य प्रा.विद्यामंदिर, पैठण येथील १२३३ विद्यार्थ्यांनी आंतरराष्ट्रीय योगदिनी योग व प्रणयमाचे धडे घेतले. "ओंकारं बिंदुसंयुक्तं नित्यं ध्यायन्ति योगिन। कामदं मोक्षदं चैव ओंकाराय नमो नमः।।" या श्लोकाच्या अर्थ असा की बिंदुसहित असलेल्या ओंकाराचे योगीजन नित्य ध्यान करतात. सर्व कामना आणि मोक्ष प्रदान करणाऱ्या त्या ओंकाराला माझा वारंवार नमस्कार असो. अशा श्लोकाचा अर्थडोळ्यासमोर ठेवत त्रिवार ओंकार घेत योग दिनास प्रारंभ करत बाराव्या आंतरराष्ट्रीय योगदिन पैठण येथील आर्य चाणक्य प्रा.विद्यामंदिर मधील इयत्ता पहिली ते सातवी मधील विद्यार्थ्यांनी विशेष सहभाग नोंदविला. क्रीडा शिक्षक सतिश आहेर प्राणायमाचे प्रात्यक्षिक व मार्गदर्शनाप्रमाणे विद्यार्थ्यांनी करून दाखविले. यावेळी प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक भास्कर कुलकर्णी व सर्व शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार प्रदर्शन सतिश आहेर यांनी केले.

## ऑनलाईन चक्री जुगारावर कारवाई



तभा वृत्तसेवा

**पैठण दि २१ :-** पैठण एम आय डी सी पोलीस स्टेशन हद्दीतील संत एकनाथ साखर कारखाण्यासमोर एका पत्राच्या शेडमध्ये चालणाऱ्या ऑनलाईन चक्री जुगारावर स.पो.नि भारत मोरे यांच्या पथकाने कारवाई केली असून या ठिकाणाहून जुगार साहित्य तसेच जुगार चालवाणाऱ्या कृष्णा तांबे या आरोपीला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. सपोनि भरत मोरे, उप पो नि.दशर बुरकुल, पो. कॉ. करतारसिंग सिंघल ,पंडित, कृष्णा उगले, करतरसिंग सिंगल, गोपाळघरे आदींचा या कारवाईत सहभाग होता.

## ब्लु माउंटेन प्री स्कूलमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन व फादर्स डे उत्साहात साजरा



तभा वृत्तसेवा

**बिडकीन दि २१ जून :** बिडकीन, पैठण तालुक्यातील बिडकीन येथील सेठ मोतीलाल तोतला शैक्षणिक संस्था संचलित ब्लु माउंटेन प्री स्कूलमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन व फादर्स डे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी शाळेच्या संचालिका सविता तोतला यांनी विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय योग दिन व फादर्स डेचे महत्त्व समजावून सांगितले. योगामुळे होणारे शारीरिक व मानसिक फायदे, निरोगी जीवनासाठी योगाची आवश्यकता तसेच वडिलांविषयी आदर, प्रेम व कृतज्ञता व्यक्त करण्याचे महत्त्व त्यांनी विद्यार्थ्यांना सोप्या भाषेत पटवून दिले. त्यानंतर शाळेतील शिक्षिकांनी विद्यार्थ्यांना योगाचे महत्त्व व विविध योगासनांची माहिती दिली. शिक्षिकांच्या मार्गदर्शनाखाली चिमुकल्या विद्यार्थ्यांनी विविध योगासने व प्राणायामाचे प्रात्यक्षिक सादर केले. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत योगाभ्यासाचा आनंद लुटला. फादर्स डे निमित्त विद्यार्थ्यांसाठी विशेष पपेट शोचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमातून वडिलांप्रती आदर, प्रेम, कृतज्ञता आणि कुटुंबातील नातेसंबंधांचे महत्त्व विद्यार्थ्यांना प्रभावीपणे सांगण्यात आले. चिमुकल्या विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाचा मनमुराद आनंद घेतला. योग दिन आणि फादर्स डे या दोन्ही उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आरोग्यदायी जीवनशैलीची जाणीव निर्माण होण्याबरोबरच कुटुंबीयांविषयी प्रेम, जिव्हाळा आणि आदराची भावना अधिक दृढ झाली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेतील सर्व शिक्षिका, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## मोहरमच्या पार्श्वभूमीवर सोयगाव रूट मार्च

**सोयगाव,दि.२१ वार्ताहर :** मोहरमच्या पार्श्वभूमीवर शनिवारी(दि.२०) पाच वाजेच्या सुमारास शहरातील विविध भागात सोयगाव पोलीसांनी रूट मार्च केला. यावेळी शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी नागरिकांना



आवाहन करण्यात आले होते. दरम्यान सहाय्यक पोलीस निरीक्षक दिनकर गोरे यांनी सोयगाव पोलीस ठाण्याचे पोलीस कर्मचाऱ्यांना प्रशिक्षणही दिले दरम्यान संध्याकाळी सुरु झालेला शहरातील रूट मार्च विविध भागातून रात्री साडे आठ वाजेपर्यंत सुरु होता सहाय्यक पोलीस निरीक्षक दिनकर गोरे यांनी सोयगाव पोलीसांना दंगल नियंत्रण,याव्यतिरिक्त नवनवीन प्रशिक्षण दिले शहरात काही ठिकाणी दंगा काबूचे प्रात्यक्षिक ही करण्यात आले.यावेळी संदीप सुसर,गजानन दांडगे,अजय कोळी,समाधान बारी,तांगडे साहेब,दांडगे साहेब,शांताराम सपकाळ,माधुरी लोखंडे,प्रियंका बोडखे यांचेसह गृहरक्षक दलाचे जवान सहभागी झाले होते.